
Manmade Evil
(मानवाने बनवलेला मानवी राक्षस)
प्रिती बांदल

# Manmade Evil

# (मानवाने बनवलेला मानवी राक्षस)

प्रिती बांदल

ई साहित्य प्रतिष्ठान

# Manmade Evil

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# Manmade Evil

## (मानवाने बनवलेला मानवी राक्षस) (दिर्घकथा)

प्रिती बांदल

Mail ID- pritibandal1270@gmail.com

Phone no- 9769526166

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३० जून २०२०

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.


©esahity Pratishthan®2020

# अर्पणपत्रिका

***Wholeheartedly dedicated to***

***My mom, dad & my family***

# प्रिती बांदल



माझे नाव प्रिती बांदल. लिखाणाच्या या क्षेत्रात मी 'Newbie' आहे. Newbie म्हणजे New comer किंवा या क्षेत्रात उतरलेली नवीन मुलगी जिला लिखाणाचा फारसा अनुभव नाही. मला लिखाणाचा तसा फारसा अनुभव नाही पण तरी मला लिखाणाची खूप आवड आहे कारण लिखाण हे असे माध्यम आहे ज्याने आपण आपल्या भावना, कल्पना इत्यादी व्यवस्थितपणे लोकांसमोर मांडू शकतो.

मी सध्या एका Private कंपनी मध्ये नोकरी करते पण लिखाणाची आवड मला लहानपणापासूनच आहे त्यामुळे जसा वेळ मिळेल तसे मी लिखाणाला प्राधान्य देते. मला वाचण्यासाठी आणि लिहण्यासाठी रहस्य, रोमांचक कथा खूप आवडतात. जेव्हा जेव्हा मी कथा लिहते तेव्हा मी 'keep reading' ही phrase नक्कीच वापरते ज्याचा अर्थ 'नेहमी वाचत राहा' असा होत नाही आहे तर तुम्हाला 'जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आणि तसे वाचत राहा' असा आहे कारण वाचनामुळे माणसाची चांगले विचार करण्याची क्षमता वाढते आणि जर का माणसाचे चांगले विचार करण्याची क्षमता वाढली तर नक्कीच माणसाच्या स्वभावात चांगला बदल होतो आणि जर का माणसाच्या स्वभावात चांगला बदल झाला तर साहजिकच तो नक्कीच एक चांगला माणूस बनतो. माझ्या मते वाचणे म्हणजे स्वतःच्या शरीरातील दुसरा आत्मा शोधणे आणि लिहिणे म्हणजे त्याच शरीरातील दुसरा आत्मा तयार करणे.

मी माझे आई वडील आणि माझ्या कुटुंबीयांची आभारी आहे ज्यांनी मला वेळोवेळी साथ दिली आणि ज्यांच्यामुळे मला लिहण्याची प्रेरणा मिळाली शिवाय मी मनापासून धन्यवाद

देऊ इच्छिते माझ्या सर्व वाचकांना आणि माझ्या लिखाणावर समीक्षा देणाऱ्या आणि माझे अनुसरण करणाऱ्या लोकांना कारण त्यांच्यामुळेच माझा लिखाणातील रस दिवसेंदिवस वाढत आहे. मी आशा करते की माझी ही काल्पनिक कथा देखील तुम्हाला नक्कीच आवडेल.

शिवाय माझी दुसरी कथा 'My cute weirdo-कलियुगाचे योद्धे' ही Amazon kindle वर उपलब्ध आहे ती देखील वाचा ही नम्र विनंती.

Priti A Bandal

Mail ID- pritibandal1270@gmail.com

Phone no- 9769526166

# प्रस्तावना

अलौकिक शक्ती असलेला वाईट योद्धा म्हणजेच राक्षस अशी सर्वांची राक्षसासाठी असलेली संकल्पना आहे. पण हे खरंच आहे का? फक्त अलौकिक शक्ती असलेला वाईट योद्धा म्हणजेच राक्षस? किंबहुना हे सत्य असेलही पण माझ्या मते हे अर्ध सत्य आहे कारण मनुष्य हा असा राक्षस आहे ज्याच्यापुढे इतर राक्षसही नमतात. मनुष्याकडे असलेली बुद्धिमत्ता ही त्याच्या प्रगतीला आणि अधोगतीलाही कारणीभूत ठरते. या कथेतही 'Manmade Evil' म्हणजेच मानवाने बनवलेल्या राक्षसाची कथा मांडली आहे.

मी लिहलेली ही कथा काल्पनिक आहे; ज्यात देवाचे वरदान म्हणून मिळालेली प्रचंड बुद्धिमत्ता असलेल्या विल्सनची आणि त्याच्या जीवनावर documentary बनवणाऱ्या सुझीची कथा मांडली आहे. सुझी कोण आहे? विल्सन कोण आहे? 'blackout day' म्हणजे काय आणि या घटनेमागील गुन्हेगार कोण आहे? इस्त्राईल मध्ये अचानक उत्पन्न झालेली महामारी यामागील रहस्य काय आहे? विल्सनला मिळालेली बुद्धिमत्ता हे खरंच देवाचे वरदान आहे की त्यामागेही काही रहस्य आहे? हे गूढ शिवाय इतर बऱ्याच गोष्टी मी या कथेत मांडल्या आहेत. या कथेत मी काही सोप्या इंग्रजी भाषेतील शब्द उदा. Blackout day, antidote इत्यादी शब्द वापरले आहेत जेणेकरून ही कथा सर्वांना पटकन कळावी आणि आपलीशी वाटावी.

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोनाच्या महामारीमुळे मला ही कल्पना सुचली. या कल्पनेला twist & turn देऊन मी ही कथा लिहली आहे. मला विज्ञान श्रेत्राबद्दल फारशी माहिती नाही म्हणून या कथेसाठी विज्ञानाशी निगडित बाबींचा थोडा अभ्यास करावा लागला. तसेही अश्या विज्ञान कथा लिहणे हे इतर गोष्टीपेक्षा कठीण काम आहे, हे मी स्वतः कथा लिहून

अनुभवलेच आहे. त्यामुळे अश्या विज्ञान कल्पनारम्य कथा लिहणाऱ्या आणि लेखनाची प्रतिष्ठा वाढवणाऱ्या आणि वाढवत असलेल्या सर्वांना मनापासून धन्यवाद. शिवाय सर्व वाचकांना मी मनापासून सांगू इच्छिते की तुमचा अभिप्रायच माझ्यासाठी मोलाचा असेल. तेव्हा कथा वाचा, आणि अभिप्राय देऊन नक्की सांगा ही कथा तुम्हाला कशी वाटली.

प्रिती बांदल


Manmade
Evil
PhotoGrid

15 वर्षाअगोदर..............

ठिकाण-अमेरिका

अमेरिकेत वैज्ञानिकांची सर्वात नावाजलेली टीम होती ज्याचे नाव होते 'we scientist' जी अमेरिकेचीच नाही तर जगातील सर्वात हुशार टीम होती. त्यांनी केलेले सर्व प्रोजेक्ट हे इंटरनॅशनली approved प्रोजेक्ट होते आणि आजही ही टीम एका नवीन प्रोजेक्टवर त्यांच्याच लॅब मध्ये जी अमेरिकेत होती तेथेच काम करत होते. या टीम मध्ये चोवीस जण होते. या सर्वांचे आजचे प्रोजेक्ट होते एका रोगाच्या विरोधात लस शोधून काढणे आणि याच कामासाठी We scientist चे सगळे म्हणजेच चोवीस सदस्य एकाच वेळी एकत्र या लॅब मध्ये काम करत होते. ते काम करत असलेली लॅब शहरापासून बरीच लांब होती.

खरं तर शहरापासून बरेच लांब अमेरिकेच्या सरकारने त्यांना एक मोठे घर बांधून दिले होते. ते घर हा फक्त दिखावा होता पण त्या घरात मध्यभागी असलेल्या मोठया लिफ़्ट मधून खाली म्हणजे जमिनीच्या अंतर्गत भागात ही लॅब उभारली होती. त्याला कारणही तसेच होते कारण जर कोणत्याही शत्रूने security च्या माणसांना मारून या लॅबवर हल्ला केला तर प्रथम तर त्याला घरात लॅब कुठे आहे हे कळणार नाही आणि शोधताही येणार नाही आणि जरी कळलेच तरीही लॅब मध्ये प्रवेश करता येणार नाहीच शिवाय ती संपूर्ण लॅब सॉफ्टवेअर सिस्टिम द्वारे संरक्षित केली होती. त्या लॅबच्या आत जाणे किंवा त्या लॅब मधून बाहेर येणे याची फक्त We scientist च्या सदस्यांनाच परवानगी होती. We scientist चे सदस्य आपल्या हातांच्या ठश्यांनी याच सॉफ्टवेअर द्वारे scan करून त्या लॅबच्या आत बाहेर प्रवेश करत. इतर कोणाच्याही हातांच्या ठशांनी किंवा नुसत्या स्पर्शाने देखील या लॅबचा दरवाजा उघडत नसे शिवाय तसे करण्याचा कोणी प्रयत्न केला तर याची खबर लगेचच जवळच्या पोलीस

स्टेशनला मिळत असे तसे feature त्या सॉफ्टवेअर मध्ये टाकलेच होते; पण तरीही त्या लॅबच्या जवळ कोणी भिरकले तर तेथे security साठी बरीच माणसे ठेवली होती, जे कोणा नवीन किंवा अनोळखी माणसाला त्या लॅब मध्ये जाण्यास परवानगी देत नसे. त्यातूनही कोणी जबरदस्ती जाण्याचा प्रयत्न करत असेल तर हीच माणसे त्या माणसाला अडवून पोलिसांच्या स्वाधीन करत. त्यामुळे फक्त अमेरिकेचेच शत्रू किंवा technology नाही तर इतर देशातीलही शत्रू किंवा technology देखील या लॅबमध्ये प्रवेश करू शकत नव्हती.

आपण तयार केलेल्या नवनवीन प्रोजेक्ट बद्दल कोणाला माहिती मिळू नये किंवा त्याची चोरी कोणी करू नये म्हणून त्यांनी त्यांच्या लॅबची security अत्यंत सुरक्षित ठेवली होती. या चोवीस जणांनी मिळून अहोरात्र परिश्रम करून हे सॉफ्टवेअर बनवले होते ज्याला अमेरिकेच्या सरकारनेही संमती दिली होती. आतून लॅब प्रचंड मोठी आणि सफेद रंगाची होती. रचना मात्र इतर लॅब सारखीच होती प्रत्येकाला काम करण्यासाठी desk, ठिकठिकाणी ट्यूब मधून ठेवलेली रसायने इत्यादी. We scientist चे सदस्य पांढरे कपडे परिधान करून, हातात gloves आणि डोळ्यावर पारदर्शी असा चष्मा घालून मग्न होऊन काम करत होते.

एवढ्यात अचानक सगळ्या लॅबच्या lights एक एक करून बंद झाल्या. We scientist चे चोवीस जण या प्रकाराने थक्कच झाले कारण हे असे पहिल्यांदाच होत होते. कितीही झाले आणि अमेरिकेत काहीही प्रॉब्लेम झाला तरी या लॅबची light कधीच जात नसे. पण आज असे अचानक झाल्यामुळे त्यांना हे तर कळले होते की कोणीतरी main switch मध्ये काहीतरी गडबड केली आहे. सगळ्या लॅबमध्ये अंधार झाला होता आणि त्या अंधारात एक वेगळाच धूर येऊ लागला. त्या चोवीस जणांचा मुख्य 'ऑलिव्हर' ने ही आपल्या डोळ्यावरील चष्मा काढला आणि चेहऱ्यावरील मास्क काढले. इतर वैज्ञानिकांनी चेहऱ्यावर मास्क घातले नव्हते फक्त ऑलिव्हरनेच चेहऱ्यावर मास्क घातला होता.

चेहऱ्यावरील मास्क काढल्यावर सगळीकडे धुराच्या पसरलेल्या वासाने त्याला एवढे कळले होते की कोणीतरी त्यांच्या लॅब मध्ये प्रवेश केला आहे. त्याने एक एक करून आपल्या इतर साथीदारांना हाक मारण्यास सुरुवात केली पण आश्चर्य म्हणजे त्याला त्या काळोखात फक्त त्याच्या साथीदारांचे आवाज ऐकू येत होते पण ते कुठे आहेत याचा तर्क लागत नव्हता. कारण अंधार इतका होता की डोळ्यात बोट घातले तरीही दिसणार नाही. त्यामुळे त्याला त्या अंधारात त्याला काहीच दिसत नव्हते. शिवाय आपल्या साथीदारांकडे जाण्यासाठी त्याला आपल्या जागेवरून हलताही येत नव्हते. जणू त्याचे शरीर कमकुवत झाले होते आणि पाय जमिनीला चिकटून राहिले होते. मोबाईल मधील flashlight मधून त्याला अंधारात कोण कोठे आहे हे दिसले असते पण त्यांचा टीमचा असा नियम होता की काम करताना सगळे मोबाईल लॅब मध्येच असलेल्या locker रूम मध्ये ठेवत, जेणेकरून कामातून लक्ष विचलित होऊ नये. हा नियम ऑलिव्हरनेच बनवला होता, पण आता त्याला या अंधारात आपण हा नियम का काढला याचे वाईट वाटत होते.

ऑलिव्हर पुन्हा पुन्हा आपल्या साथीदारांना हाका मारत होता पण तरीही अजून त्याला फक्त त्यांचे प्रतिसाद ऐकू येत होते. पण आता त्याला त्याच्या साथीदारांच्या प्रतिसादाऐवजी त्यांच्या आर्त किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या. त्याच किंकाळीने ऑलिव्हरच्या अंगावर काटा उमटला होता. त्याचे हातपाय आता थंड पडले होते. त्याला काहीच सुचत नव्हते. त्याच्या सर्वांगातून भीतीने दरदरून घाम फुटला होता. प्रचंड बुद्धिमत्ता असूनही या क्षणाला काय करावे हे त्यालाही कळत नव्हते. पोलिसांना फोन करावा तर हातात फोनही नव्हता. आधीच जागीच खिळून उभा असलेला ऑलिव्हर आता चांगलाच घाबरला होता.

बराच वेळ तो तसाच घाबरून उभा होता आणि अचानक काही वेळाने त्याला त्याच्या साथीदारांच्या किंकाळ्या येणे बंद झाले आणि हळू हळू सगळीकडे भयाण शांतता पसरली. त्या भयाण अंधारात आणि शांततेत त्याला कोणाच्या तरी त्याचाच दिशेने येणाऱ्या बुटांचा

आवाज ऐकू येऊ लागला. तो बुटांचा आपल्या दिशेने येणारा आवाज ऐकून त्याचे हृदय जोरजोरात धडधडू लागले. त्याने एक मोठा आवंढा गिळला. पण काहीच क्षणात तो बुट घातलेला मनुष्य ऑलिव्हरच्या एकदम जवळ आला आणि आपल्या हातातला सूरा त्याने ऑलिव्हरच्या पोटात घुपसला. त्या काळोख्या अंधारात आणि जागीच खिळून उभा असलेल्या ऑलिव्हरला प्रतिकारही करता आला नाही आणि काहीच क्षणात अखेर ऑलिव्हरचीही शेवटची आर्त किंकाळी बाहेर आली आणि त्याच्या इतर साथीदाराप्रमाणे त्यालाही मरण आले.

'We scientist' चे सगळे वैज्ञानिक मरण पावल्यावर तो बूट घातलेला मनुष्य आपल्या चेहऱ्यावर क्रूर हास्य आणत तसाच त्या लॅब मधून सहज बाहेर आला कारण त्याने आधीच या लॅबचे security सिस्टिम hack केले होते शिवाय या लॅबला security देणाऱ्या माणसांनाही त्याने आधीच मारले होते त्यामुळे त्याला अडवण्यासाठी तेथे कोणीच नव्हते. त्याने काळ्या कलरचा कोट घातला होता ज्यावर एका कोपऱ्यात लिहलेले होते 'Manmade Evil' आणि ज्याला लागूनच हुडी सारखी मागून टोपी होती. आपल्या कोटाला असलेली ती टोपी डोक्यात घालून स्वतःचा चेहरा मास्कनी लपवून, हातात काळ्या रंगाचे gloves आणि पायातही काळ्या रंगाचे बूट शिवाय डोळ्यावर वेगळाच चष्मा घालून तो तेथे आला होता आणि आपल्याकडे असलेल्या सुऱ्याने एका वहशी जनावराप्रमाणे त्याने एक एक करून 'We scientist' च्या सर्व चोवीस वैज्ञानिकांना प्रतिकार न करताच मारून टाकले. आपल्या डोळ्यावरील चष्मा काढत, आपली मान झटकत आपल्या निळयाशार डोळ्यांनीच विजयाचा फताका फडकावत तो मनुष्य तेथून कोणाच्याही हाती न लागता मोठया हुशारीने निघून गेला.

15 वर्षानंतर.............

ठिकाण-इस्त्राईल (Israel)

इस्त्राईल मध्ये ठिकठिकाणी इस्पितळांसमोर पीडित व्यक्तींचे नातेवाईक 'Release human Alien' असे आंदोलन करत होते आणि सगळ्या न्युज channel मध्ये देखील वारंवार तेच दाखवत होते. संपूर्ण जनता 'human alien' ला कैदेतून सोडण्यासाठी सरकारवर दबाव टाकत होती शिवाय इतर 63 देशही human alien ला कैदेतून सोडण्यासाठी इस्त्राईलच्या सरकारवर फोर्स करत होते त्यामुळे इस्त्राईलचे सरकारही नमले होते. जनतेच्या आणि सरकारच्या दबावामुळेच आज इस्त्राईल मधील तब्बल 200 वैज्ञानिकांची टीम विडिओ कॉन्फरेन्सद्वारे एकमेकांशी संवाद साधत होती. त्यांची एवढी मोठी चर्चा चालली होती ती फक्त Human alien म्हणजे जगातील सर्वात मोठा वैज्ञानिक 'विल्सन रॉबर्ट' ला सोडवण्यासाठी.

विल्सन हा इस्त्राईल मधीलच नाही तर संपूर्ण जगातील सर्वात हुशार असा वैज्ञानिक होता आणि त्याची प्रगल्भ बुद्धिमत्ता ही सगळ्या जगातील वैज्ञानिकांच्या दहा पटीने जास्त होती. इतर वैज्ञानिक एकाच विषयात पारंगत असत जसे astronomer स्टार, प्लॅनेट वैगेरे चा अभ्यास करण्यात तत्पर असत, आणि botanist प्लांट्स मध्ये. पण विल्सनची बुद्धी एवढी होती, की तो सगळ्याच विषयात पारंगत होता. त्याच्याकडे असलेली बुद्धीमत्ता हे God's gift म्हणजेच देवाने दिलेले एक वरदान असले तरी त्याच्याहून कमी बुद्धिमत्ता असलेल्या लोकांसाठी ते हितावह नव्हते. त्याच्या या बुद्धिमतेचा त्याने कुठेच गैरवापर करू नये म्हणून

त्याला तब्बल 10 वर्ष त्यानेच मोठमोठया गुन्हेगारांना ठेवण्यासाठी बनवलेल्या सिस्टीमॅटिक जेल मध्ये कैद केले होते.

पण तब्बल 10 वर्षांनंतर आता संपूर्ण इस्राईल मध्ये एक वेगळ्याच प्रकारची महामारी आली होती ज्याला काही नावही नव्हते आणि तोडही नव्हते. या महामारीत लोकांना सुरुवातीला साध्या आजाराने आणि मग नंतर भल्या मोठया आजाराने ग्रासले जात होते. त्यात माणसाचे शरीर अर्धमेले होत असे आणि तो मनुष्य अंथरुणालाच खिळून बसत. शिवाय त्याच्या पूर्ण शरीराला सूज येत असे. आणि त्याचमुळे या महामारीचे शिकार होऊन इस्राईल मधील बहुतांशी जनता मृत्यूमुखी पडत चालली होती. ही महामारी एका संसर्गजन्य रोगासारखी फक्त इस्राईलच्या देशात सर्वत्र पसरत होती. आणि इस्राईल मध्ये जन्माला आलेल्या या महामारीचे निदान करणे आणि त्याच्यावर antidote म्हणजेच त्याचे तोड किंवा ओषध शोधून काढणे हे कोणत्याच देशातील वैज्ञानिकांना जमत नव्हते. शिवाय ही महामारी इतर देशात पसरू नये म्हणूनच इस्राईल मधील आणि इतर देशातील जनताही विल्सनला, ज्याला त्याच्याकडे असलेल्या बुद्धिमतेमुळे जनतेने 'Human alien' हे नाव दिले होते, कारण त्याला एवढी बुद्धिमत्ता कुठून मिळाली हे आश्चर्यच आणि कोडंच होतं, सोडवण्यासाठी मागणी करत होते. कारण तोच एक असा वैज्ञानिक होता जो सर्व देशावर आलेल्या या महामारीच्या प्रलयाला थांबवू शकत होता. शेवटी महामारीचे संकट लक्षात घेता शिवाय जनता आणि सरकारच्या दबावामुळे इस्राईल मधील 200 वैज्ञानिकांच्या टीमला विल्सनला सोडण्यासाठी तयार व्हावेच लागले आणि त्यांनीच पास केलेल्या निर्णयामुळेच आता विल्सनला दोन दिवसांनी त्या जेलमधून बाहेर काढण्यात येणार होते.

दुसरीकडे 'सुझी' जिने मोठंमोठया लोकांच्या डॉक्यूमेण्टरी केल्या होत्या तिला तिच्या एडिटरने प्रख्यात वैज्ञानिक विल्सनची डॉक्यूमेण्टरी करण्याचे काम सोपले होते. सुझी ही

मूळची इस्राईलचीच, पण ती शिक्षणासाठी अमेरिकेत गेली, आणि तेथेच स्थायिक झाली होती. पण हे महामारीचे संकट इस्राईलवर आल्यावर ती कालच इस्राईल मध्ये आली होती.

सुझीचे वय साधारण 28, पाणीदार आणि सुबक डोळे, गोलाकार चेहरा, साधारण उंच, गोरा वर्ण आणि बॉयकट असलेले केस. सुझी आपल्या कामात एकनिष्ठ होती. ती अमेरिकेत असतानाच जवळ जवळ सहा महिन्यापासून विल्सनची त्याला ठेवलेल्या जेलमध्ये भेट व्हावी म्हणून सगळ्या वरिष्ठ लोकांना ई-मेल करत होती. शिवाय जमलेच तर त्यांची भेट घेऊन विल्सनला एकदा भेटण्यासाठी विनवणी करत होती. त्याचेच फळ म्हणजे तिला आज विल्सनला भेटण्यासाठी परवानगी मिळाली होती. तसे दोन दिवसाने विल्सन जेलमधून सुटणार होताच. पण तरीही कुठेही का होईना विल्सनला भेटण्याची परवानगी मिळाली होती. त्यामुळे ती आज खुपच खुश होती.

सुझीला विल्सनला भेटून डॉक्यूमेण्टरी करण्यासाठी त्याची परवानगी घायची होती. तशी तिने त्याच्याबद्दल बरीच माहिती काढली होती. विल्सन हा 30 वर्षाचा होता. थोडा सडपातळ, साधारण उंच, गोरा वर्ण, गोलाकार चेहरा शिवाय चेहऱ्यावर तेज वाखाणण्याजोगे. विल्सन एक अनाथ होता आणि त्याचे संपूर्ण बालपण अनाथ-आश्रमातच झाले. त्यामुळे त्याच्या बुद्धीचे मूळ हे एक रहस्यच होते. वयाच्या 15 व्या वर्षी ज्या वेळी इतर मुले शिक्षण घेत असतात त्याचवेळी त्याच्याकडे असलेल्या प्रचंड बुद्धिमतेमुळेच त्याने आपले सगळे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने आपल्या बुद्धिमतेने संशोधन करून नवीन नवीन तंत्रज्ञान शोधले. त्याने नेहमीच आपल्या बुद्धिमतेचा उपयोग लोकांच्या भल्यासाठीच केला.

काही जण असे म्हणत की त्याला लाभलेली बुद्धिमत्ताही 'God's gift' म्हणजेच देवाचे वरदान आहे. त्याने आपल्या बुद्धिमतेने तीन ते चार वर्षातच खुप सारे प्रोजेक्ट केले ज्याचे जगभरातील लोकांनी कौतुकही केले. पण प्रत्येक जगभरात होत असलेली त्याची वाह वाह ही काही वैज्ञानिकांना रुचलीही नव्हती आणि पटलीही नव्हती. म्हणून इस्राईल मधील बहुतांशी

वैज्ञानिकांनी विल्सन विरुद्ध बैठक केली. जवळ जवळ एक वर्ष त्याच्या खुप साऱ्या तपासण्या झाल्या. त्याच्या बुद्धीचे मूळ शोधण्याचे शर्थीचे प्रयत्न या वैज्ञानिकांनी केलेही, पण त्याच्या बुद्धीचे मूळ कोणालाही सापडले नाही. त्याने आपल्या बुद्धीचा दुरुपयोग करू नये यासाठी सगळ्या वैज्ञानिकांनी मिळून सर्व प्रक्रिया करून त्याला कैद करण्याची सरकारकडे विनंती केली. इस्राईलच्या सरकारने या वैज्ञानिकांच्या आणि इतर 63 देशांच्या दबावामुळेच शिवाय भल्या मोठया वाद आणि विवादानंतर त्याला त्यानेच बनवलेल्या प्रचंड सुरक्षित जेलमध्ये बंदिस्त केले. तसा इस्राईलच्या नागरिकांनी त्याला विरोधही केला पण त्यांचे काही एक कोणीच ऐकले नाही.

सुझी आपल्या गाडीने विल्सनला ज्या जेलमध्ये ठेवले होते तेथे आली. ती गाडीतून उतरून आत जेल मध्ये जाऊ लागली, तेव्हा जेलच्या बाहेर असलेल्या माणसांनी तिला थांबवले. तिची आणि तिच्या सामानाची तपासणी करून तिला त्या जेलमध्ये प्रवेश घेण्यासाठीचे ID कार्ड दिले. ते ID कार्ड घेऊन सुझी जेलच्या आत गेली. तिच्या सोबत एक security गार्ड देखील होता. त्या security गार्डने सुझीकढील ते ID कार्ड घेतले आणि दरवाजावर असलेल्या सॉफ्टवेअर मध्ये ID कार्ड scan केले तसा जेलमध्ये जाण्यासाठी असलेला प्रचंड आणि भारदस्त सिस्टिमद्वारे संरक्षित केलेला दरवाजा उघडला. पुढे तो security गार्ड आणि मागे आश्चर्यचकित होत सगळे टिपत असलेली सुझी दोघेही त्या जेलच्या आत आले. सुझीने पाहिले की जेल आतून बरेच मोठे होते. शिवाय जेलच्या सर्व भिंती सफेद रंगाच्या होत्या आणि सफेद रंगाचेच बरेच दरवाजेही होते.

सुझीला कोणत्या दरवाजाने आत जायचे आहे हेच कळत नव्हते. तेव्हा पुन्हा तो security गार्ड बऱ्याच दरवाज्यांपैकी असलेल्या एका योग्य दरवाज्यापाशी गेला आणि तो उघडून तिला आत नेले पण तो दरवाजा उघडल्यावरही अजून बरेच दरवाजे समोर दिसत

होते. असेच एक एक योग्य दरवाजे उघडता उघडता तब्बल 20 योग्य दरवाजे उघडल्यावर सुझी आणि तो security गार्ड जेलच्या मध्यभागी आले जेथे विल्सनला ठेवले होते.

सुझीला आता कळत होते की विल्सन किती मोठा वैज्ञानिक आहे शिवाय security गार्ड तिच्या सोबत का आला कारण हे जेल एका भुलभुलैय्या सारखे बनवले होते आणि त्यात भरपूर असे दरवाजे होते. कोणता दरवाजा कुठे जाईल हे शोधता शोधता मनुष्य त्या जेल मध्येच अडकून राहील. शिवाय जेल मध्ये ठेवलेल्या गुन्हेगाराने पळण्याचा प्रयत्न केला, तरीही त्याचा काहीही फायदा नव्हता. कारण असेच भुलभुलैय्या असलेले एक नाही तर तब्बल 20 दरवाजे पार केल्यावरही जेलचा मुख्य दरवाजा ID कार्ड द्वारेच उघडू शकत होता. शिवाय मुख्य दरवाजाला गुन्हेगाराने स्पर्श जरी केला तरीही त्याची माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला सॉफ्टवेअरमध्ये असलेल्या feature द्वारे होत असे.

या एवढ्या मोठया आणि विल्सनने बनवलेल्या त्या संपूर्ण जेलमध्ये केवळ विल्सनलाच ठेवले होते. सर्व जेलची सिस्टिम पाहून सुझी तर पूर्णपणे शॉक होती. आता तिला विल्सन जगातील सर्वात मोठा वैज्ञानिक का आहे हे स्वतः पाहिल्यावर कळलेच होते. हे जरी जेल असले तरीही त्याच्या मध्यभागी एका आलिशान हॉटेलप्रमाणे होते आणि त्यात विल्सनला सर्व खाणे, पिणे, झोपणे इत्यादी अश्या बऱ्याच सुविधा उपलब्ध होत्या. फक्त बाहेरून एक कणही आत येऊ शकणार नाही याचा सिस्टिमद्वारेच चोख बंदोबस्त होता.

सुझी सोबत आलेल्या त्या security गार्डने सुझीला त्या जेलच्या मध्यभागी जेथे विल्सन राहत होता तेथेच त्याच्या स्टडी रूमचा दरवाजा उघडून दिला आणि तिला आत जायला सांगितले आणि तो तसाच बाहेर जाऊन उभा राहिला. सुझीने विल्सनच्या स्टडी रूम मध्ये प्रवेश केला तर एका बाजूला विल्सन एका चेअरवर मोठया अदबीने बसून पुस्तकं वाचत होता आणि सुझी दुसऱ्या बाजूला उभी होती. दोघांच्याही मध्ये पारदर्शक अशी भिंत होती पण आश्चर्य

म्हणजे त्या पारदर्शक भिंतीतून दोघांनाही एकमेकांचा आवाज येऊ शकत होता. सुझीला पाहून विल्सनने पुस्तक वाचणे बंद केले आणि तिच्याकडे पाहत बोलू लागला.

"मिस सुझी तुम्ही माझी भेट फक्त डॉक्यूमेण्टरी बनवण्यासाठी करत आहात की अजून काही कारण आहे? "

विल्सनचे हे बोलणे ऐकून सुझी चांगलीच थक्क झाली कारण ती विल्सनला पहिल्यांदा भेटत होती आणि विल्सनला ती फक्त डॉक्यूमेण्टरीसाठी नाही तर अजून एका डॉक्यूमेण्टरीसाठी भेट घेऊ पाहत होती आणि हे विल्सनला कसे कळले हाच ती विचार करत होती. ती विचार करत आहे हे ओळखून विल्सन खुर्चीवरून उठत चेहऱ्यावर गोड हास्य आणत तिला बोलू लागला.

"तुला इतका विचार करून बोलायचे असेल तर मला बरीच कामे आहेत. "

असे बोलून विल्सन तेथून निघत होताच इतक्यात सुझीने स्वतःला सावरत त्याला सांगितले.

"मी इथे फक्त तुमच्या आयुष्यावर डॉक्यूमेण्टरी करायला नाही आली आहे तर त्यासोबतच मी 'ब्लॅकआउट डे' चीही डॉक्यूमेण्टरी करणार आहे आणि त्याबद्दल तुम्हाला काही माहिती आहे का? हे देखील मला तुम्हाला विचारायचे होते आणि म्हणून मला तुमची भेट घायची होती."

सुझीने 'ब्लॅकआऊट डे' हे बोलल्यावर यावेळी विल्सन विचार करू लागला तेव्हा त्याला विचारात पाहून सुझी बोलू लागली.

"बहुतेक तुम्हाला माहित नाही म्हणून तुमच्या माहिती साठी सांगते की 'ब्लॅकआऊट डे' म्हणजे.... "

सुझी बोलतच होती इतक्यात तिला मध्येच अडवत विल्सन बोलू लागला.

"ब्लॅकआऊट डे मला माहित आहे. 15 वर्षाअगोदर अमेरिकेत वैज्ञानिकांची 24 जणांची एक टीम होती ज्याचे नाव होते 'we scientist' आणि या वैज्ञानिकांना लॅब मध्ये प्रोजेक्ट करतानाच एक एक करून एका काळे कपडे घालून आलेल्या माणसाने त्यांच्या पोटात सुरा घुपसून वहशी जनावराप्रमाणे मारून टाकले. आश्चर्य म्हणजेच अमेरिकेची सुरक्षा व्यवस्था सगळ्या देशापेक्षा श्रेष्ठ आहे. 'we scientist' ज्या लॅब मध्ये काम करत होते त्या लॅबचीही सुरक्षा प्रचंड होती तरीही तो मनुष्य सहजतेने त्या लॅब मध्ये घुसला आणि सगळ्या वैज्ञानिकांना आणि बाहेर असलेल्या security च्या माणसांना मारून तितक्याच सहजतेने तेथून बाहेरही आला. ब्लॅकआऊट म्हणजे 'थोडा वेळ शुद्ध हरपण्याचा काळ'. पण ज्या दिवशी अमेरिकेचे हे वैज्ञानिक मारले गेले; आणि ज्या प्रकारे ते मारले गेले त्या दिवशी प्रत्येक अमेरिकन लोकांची शुद्ध हरपणेच बाकी होते. म्हणून त्या संपूर्ण घटनेला 'ब्लॅकआऊट डे' म्हणून नाव दिले गेले आणि त्या घटनेचा गुन्हेगार अजूनही सापडला नाही. 15 वर्षापासून त्याचा शोध चालूच आहे. "

सुझी-"विल्सन सर अगदी बरोबर, खरं तर मला तुमच्या आयुष्याची आणि ब्लॅकआऊट डे ची डॉक्यूमेण्टरी दोन्ही काम एकत्र करायचे आहे कारण.... "

सुझी बोलता बोलता थांबली आणि तिने एक मोठा आवंढा गिळला. तिला तसे थांबलेले पाहून विल्सनने तिला पुढे काय बोलायचे आहे हे ओळखले आणि हसून तो बोलू लागला.

"तर तू गोळा केलेल्या माहितीनुसार शिवाय माझ्याकडे असलेल्या बुद्धिमतेमूळे तुला असे वाटते आहे का की मीच तो मनुष्य आहे ज्याने त्या वैज्ञानिकांना मारले आहे? "

विल्सनच्या या बोलण्यावर सुझी काहीच बोलली नाही. ती तशीच शांत विल्सनकडे एकटक बघत होती. विल्सनही हसऱ्या चेहऱ्याने सुझीकडे बघत होता. थोडया वेळाने बाहेरून तोच security गार्ड सुझी जवळ आला आणि त्याने विल्सनला भेटण्याची वेळ संपली हे सांगितले.

सुझीलाही अजून खुप सारे प्रश्न विल्सनला विचारायचे होते शिवाय तिच्या प्रश्नाचे उत्तर की blackout day चा गुन्हेगार तोच आहे का? याचा खुलासा अजून विल्सन कडून तिला भेटला नव्हता म्हणून ती 'पण.... ' एवढेच बोलली तोच विल्सनने तिच्या बोलण्याचा रोख ओळखून तिला 'दोन दिवसांनी पुन्हा भेटू' असे सांगितले. तसे सुझीला तेथून सगळ्या प्रश्नाची उत्तरे मिळाल्यावर निघायचे होते पण तिचाही नाईलाज होता शेवटी तीही काहीही न बोलता त्या माणसासोबत त्या जागेतून बाहेर येण्यासाठी निघाली.

दोन दिवसांनी विल्सनला त्या जेल मधून बाहेर काढण्यात आले. विल्सन एका पत्रकारपरिषदेमधून नुकताच निघत होता. त्याने पत्रकारपरिषदेत सगळ्या जनतेचे आभार मानले होते. कारण त्यांच्यामुळेच त्याचा 10 वर्षाचा त्यानेच बनवलेल्या त्या जेल मध्ये त्याला कैद करून ठेवलेला वनवास संपला होता. शिवाय त्याने इस्राईल मध्ये सर्वत्र पसरलेल्या महामारीवर दहा दिवसात उपाय किंवा ओषध शोधण्याचे सर्व जनतेला वचन दिले. त्याच्या प्रगल्भ बुद्धीला आणि त्याने दिलेल्या आश्वासनाला सगळ्या जनतेने खुश होऊन स्वीकारले.

पत्रकारपरिषद आटपता आटपता रात्र झाली होती. पत्रकारपरिषद संपवून विल्सन निघतच होता की बाहेर त्याच्या सगळ्या फॅन्सनी खुपच गर्दी केली होती त्यात सुझी देखील होती. सुझीने विल्सनला येताना पाहिले आणि तिने लांबूनच ओरडून आणि हात दाखवून विल्सनचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. तसा विल्सन घाईतच होता पण त्याने दुरुनच सुझीला पाहिले आणि त्याने आपल्या एका माणसाला सुझीला आत पाठवण्यास सांगितले. तशी सुझीही लगबगीने त्याच्या जवळ आली. विल्सनने सुझीला आपल्या गाडीत बसायला सांगितले. विल्सनने आपल्या ड्राईवरला जायला सांगितले आणि तो स्वतः गाडी चालवू लागला आणि सुझी त्याच्या बाजूच्याच सीटवर बसली होती. सुझी आणि विल्सन एका गाडीत आणि विल्सनचे बॉडीगार्ड मागून दोन तीन गाड्यामधून येत होते.

विल्सन गाडी चालवता चालवता सुझीला बोलू लागला.

"मला माहित आहे की तुला असे वाटतेय की मीच 'ब्लॅकआऊट डे' च्या घटनेचा गुन्हेगार आहे. "

सुझीनेही मान हलवून होकार दिला आणि बोलली.

"खरं तर तुमच्या प्रगल्भ बुद्धीमुळे मलाच नाही तर बहुतांशी लोकांना हेच वाटतेय की तुम्हीच ब्लॅकआऊट डे चे गुन्हेगार आहात. शिवाय मी जेव्हा 'ब्लॅकआऊट डे' च्या डॉक्यूमेण्टरी साठी माहिती जमवत होते तेव्हा जमवलेल्या माहिती नुसार गुन्हेगार खुप हुशार आणि वैज्ञानिकच असावा असे मला वाटते. पण सगळ्या जगात तुमच्यासारखी बुद्धिमत्ता असलेला वैज्ञानिक कोणीही नाही. म्हणून तुम्हीच या सगळ्या प्रकरणाच्या मागे असावात असा माझा अंदाज होता. पण तसे पुरावे काही भेटले नाही म्हणूनच मला तुमच्याशी भेटणे गरजेचे होते. "

विल्सन-"पहिली गोष्ट तर मी वैज्ञानिक आहे. गुन्हेगार नाही. तसेही ब्लॅकआऊट डे ची घटना झाली तेव्हा माझे नुकतेच शिक्षण पूर्ण झाले होते. मी तेव्हा प्रसिद्धही नव्हतो मग एक सामान्य मनुष्य इतक्या लोकांना मारण्याची उठाठेव का करेल? "

विल्सनच्या बोलण्यावर सुझीने थोडा विचार केला आणि तिलाही त्याचे म्हणणे पटत होते म्हणून ती त्याला बोलू लागली.

सुझी-"हो तुम्ही जे म्हणताय ते खरं आहे पण मला वाटले की माझ्या प्रश्नाचे उत्तर म्हणजेच त्या ब्लॅकआऊट डे च्या गुन्हेगाराबद्दल तुम्हाला काही माहिती असेल पण तुम्ही तो गुन्हेगार नाही आहात हे ऐकून बरे वाटले शिवाय काहीही झाले तरी मी एक सुजाण नागरिक म्हणून का होईना पण त्या गुन्हेगाराला शोधून काढेन हे नक्कीच. "

विल्सन-"मी तो गुन्हेगार नाही. पण तो गुन्हेगार कोण आहे याची मला माहिती आहे. "

सुझी-"म्हणजे तुम्हाला त्याच्याबद्दल माहिती आहे मग प्लीज मला सांगा सर की तो कोण आहे. "

विल्सन-"तू या ब्लॅकआऊट डे ची माहिती सहा महिन्यापासून जमा करतेस मग तुझ्यावर खुपदा हल्ले झाले असतील ना? किंवा तुला मारण्याची धमकी वैगेरे मिळाली असेल ना? "

सुझी-"हो सर दोन तीन वेळा हल्ले झाले. मारण्याची धमकीही मिळाली. मला पण तुम्हाला हे सगळे कसे कळले म्हणजे याच्या मागे तुम्हीच आहात का? "

विल्सन-"नाही, तुला एकदा म्हणालो ना की याच्या मागे मी नाही. हे सगळे मला कसे माहित, तर, तुझ्याबद्दल मी माझ्या काही लोकांकडून माहिती काढली तेव्हा मला हे सगळे माहित आहे. तू दोन दिवसांपूर्वी मला जेल मध्ये भेटायला का येणार होतीस तेही मला आधीच माझ्या माणसांनी सांगितले होते. मला आधीच सगळे माहित होते. राहिला प्रश्न ब्लॅकआऊट डे च्या गुन्हेगाराचा तर तुला माहित आहे ना की मी अनाथ आहे ते."

सुझी-"सॉरी सर आता माझी पूर्ण खात्री आहे की तुम्ही या सगळ्याच्या मागे नाही. शिवाय तुम्ही अनाथ आहात हेही मला माहित आहेच. डॉक्यूमेण्टरी साठी मी तुमचीही माहिती गोळा केली आहे. पण त्याचा आणि ब्लॅकआऊट डे च्या गुन्हेगाराचा काय संबंध? "

विल्सन-"संबंध आहे कारण मी अनाथ आहे हे सगळ्यांना माहित आहे. पण हे कुणालाच माहित नाही की माझ्या आईला दोन जुळी मुले झाली होती. मला आणि माझ्या भावाला जन्म देऊन ती मरण पावली. आमचे कोणीही इतर नातेवाईक नव्हते म्हणून एका बाईने मला आणि माझ्या भावाला अनाथआश्रमात नेले. माझी आणि माझ्या भावाची बुद्धिमत्ता समान होती. पण मी माझी बुद्धिमत्ता चांगल्या कामासाठी वापरत होतो, आणि तो वाईट कामासाठी. आम्ही थोडे मोठे झाल्यावर माझा भाऊ अनाथआश्रमातून निघून गेला. तो कुठे गेला हे मलाही माहित नाही. ब्लॅकआऊट डे चा गुन्हेगार तोच आहे हे मी ठामपणे सांगू शकतो. शिवाय ब्लॅकआऊट डे

च्या घटनेची माहिती मिळवण्यापासून तुला दूर ठेवावे म्हणून तुझ्यावर झालेले सगळे हल्ले हे त्यानेच केले आहेत. "

विल्सनचे बोलणे ऐकून सुझी चांगलीच चक्रावली आणि बोलू लागली.

"म्हणजे ब्लॅकआऊट डे चा गुन्हेगार तुमचा जुळा भाऊच आहे. पण त्याला आता पकडायचे कसे? "

विल्सन-"त्याला पकडण्याचे स्वप्न सोडून दे. तसेही तू ब्लॅकआऊट डे ची माहिती शोधते आहे हे त्याला माहिती असणारच. तो तुझ्यावर कधीही हल्ला करून तुला मारू शकतो. त्यामुळे तू सावध राहा. "

सुझीने विल्सनच्या बोलण्यावर फक्त मानेनेच होकार दिला कारण सुझीला विल्सनचे बोलणे पटलेच नव्हते. विल्सन काही तरी गोष्ट बनवून सांगत आहे असे तिला वाटत होते. विल्सन स्वतःकडून तिचे लक्ष वळवण्यासाठी काहीही गोष्ट सांगत आहे असा विचार ती करत होती.

इतक्यात विल्सनने गाडी थांबवली. त्यांच्या गाडीसमोर थोडं दूर एक काळ्या कलरचा कोट घातलेला ज्याला लागूनच हुडी सारखी मागून टोपी होती असा मनुष्य उभा होता. आपल्या कोटाला असलेली ती टोपी डोक्यात घालून आपल्या निळयाशार डोळ्यांनी समोर बघत, डोळे सोडून स्वतःचा उर्वरित चेहरा मास्कनी लपवून तो गाडी पासून बऱ्याच लांब पण दिसेल असा उभा होता. त्याच्या हातात बंदुकही होती. तो मनुष्य लांब होता त्यामुळे त्याच्या हातात कोणती बंदूक आहे हे सुझी आणि विल्सनला दिसत नव्हते. पण त्याचे एकूण रूप खुप भयावह होते. त्याच्या या एकूण रूपावरून असेच भासत होते की तो जणू सुझीचा अंत करण्यासाठीच तेथे आला होता.

त्या मनुष्याला पाहून क्षणाचाही विचार न करता विल्सनने ओळखले की तो मनुष्य आपला जुळा भाऊ आहे. त्याने तसे सुझीला सांगितले आणि तिला गाडीच्या बाहेर न येण्यास बजावून तो गाडीतून उतरला. सुझीलाही त्या माणसाला पाहून विल्सन त्याच्या जुळ्या भावाबद्दल खरे बोलत होता यावर आता विश्वास बसला होता पण तिला स्वतःमुळे विल्सनला धोक्यात घालायचे नव्हते म्हणून त्याचे काहीही न ऐकता ती गाडी खाली उतरली.

गाडीच्या समोर असलेल्या त्या मनुष्याने आपली मान झटकतच क्रूर डोळ्यांनी गाडीतून खाली उतरलेल्या विल्सनला आणि सुझीला पाहिले आणि त्याने आपल्या जवळची बंदूक सुझीवर चालवली. दुसरीकडे विल्सनची माणसे म्हणजेच त्याचे अंगरक्षक मागून ज्या गाडीतून येत होते तेही गाडी थांबवून खाली उतरले. समोर असलेल्या माणसाने चालवलेली बंदूक पाहून तेही धावत त्यांच्याजवळ येतच होते. त्या माणसाने झाडलेली गोळी सुझीला लागणार, इतक्यात विल्सनने झेप घेऊन तिला बाजूला केले. त्यामुळे बंदुकीची गोळी त्याला आणि सुझीला लागली नाही. पण झेप घेऊन खाली पडल्यामुळे त्याच्या हाताला थोडे खरचटले. आपला डाव चुकला आहे आणि मागून येणारे विल्सनचे बॉडीगार्ड पाहून तो काळे कपडे घातलेला मनुष्य तेथून पळू लागला. विल्सनच्या माणसांनी त्याचा पाठलाग केला. पण काहीच क्षणात तो कुठे निघून गेला हे कोणालाच कळले नाही. जणू सर्वांना दिसणारा तो मनुष्य क्षणार्धात गायब झाला होता.

तो वार करणारा मनुष्य दिसेनासा झाल्यावर विल्सनची माणसे विल्सन आणि सुझीकडे परतली आणि त्यांना सुरक्षित विल्सनच्या घरी नेले. विल्सनला त्याच्या बेडवर झोपवून सुझी त्याच्या बाजूलाच बसली होती. विल्सनने आपल्यावरचा वार स्वतःवर घेतला हे पाहून सुझीला आपण विल्सनला किती चुकीचे समजत होतो हा विचार करूनच वाईट वाटत होते. विल्सन त्याच्या जुळ्या भावाबद्दल जे बोलत होता ते खरे होते हे तिला तिच्यावर गोळी झाडणाऱ्या माणसाला पाहून कळलेच होते. ती हताशपणे विल्सनच्या हातावर खरचटल्यामुळे झालेली जखम पाहत होती आणि स्वतःलाच दोष देत होती.

तिने विल्सनची त्याच्यावर विश्वास न दाखवल्यामुळे माफीही मागितली. विल्सननेही यात तिची चूक नाही हेही तिला समजावले. पण सुझीला बरेच वाईट वाटले होते. सुझीचा स्वतःबद्दल वाटत असलेला अपराधीपणा कमी करण्यासाठी आणि झालेल्या प्रसंगावरून तिचे लक्ष वळवण्यासाठी त्याने तिला त्याच्या जखमेवर मलमपट्टी करण्यास सांगितले. सुझीही विल्सनला मलमपट्टी करण्यासाठी लगेच तयार झाली.

विल्सनच्या सांगण्यावर मलमपट्टीचे सामान घेण्यासाठी ती त्याच्या कपाटाकडे गेली. तिने कपाट उघडले आणि मलमपट्टीचे सामान शोधता शोधता तिच्या हाती काही तरी लागले. त्याला पाहून ती थोडा वेळ तशीच स्थब्ध उभी राहिली. विल्सनने तिला 'मिळाले का सामान' असा आवाज दिला तेव्हा ती भानावर आली. कपाटातील मलमपट्टीचे सामान शोधून ते घेऊन विल्सनकडे आली. तिने विल्सनच्या हातावर मलमपट्टी केली. ती तेथून निघतच होती इतक्यात विल्सनने तिला थांबवले आणि तिला बोलला.

"तुला आठवले नाही का की मी कोण आहे ते? "

विल्सनने अचानक केलेल्या अश्या प्रश्नाने सुझीने तिला विल्सन कोण आहे हे आठवण्यासाठी थोडा विचार केला पण तिला काहीच आठवले नाही म्हणून तिने मानेनेच त्याला नकार दिला आणि तिला काहीही आठवत नसल्याचे सांगितले तेव्हा विल्सन पुन्हा तिला बोलू लागला.

"मी लहान असताना मी अनाथ आणि गरीब होतो म्हणून काही मुले मला त्रास देत होती आणि तेव्हाच तू तेथे आलीस आणि तू त्यांना चांगलाच धडा शिकवून मला वाचवले होते. माझे शिक्षण पूर्ण झाल्यावर मी तुला खुप शोधले पण तू मला भेटलीच नाही पण आता योगायोगाने तू मला भेटलीस."

विल्सनने असे बोलल्यावर सुझीलाही हळू हळू तो प्रसंग आठवू लागला. ती नऊ वर्षाची असताना तिच्या कुटुंबासोबत बाहेर फिरायला गेली असताना तिला रस्त्याच्या एका बाजूला

तिच्याहून एक, दोन वर्ष मोठी असलेली तीन, चार मुले त्यांच्याच वयाच्या एका मुलाला सतावत होती. आपल्या हातातील अंडी, कोल्डड्रिंक वैगेरे त्याच्या अंगावर टाकून त्याला हसत होती. तो लहान मुलगा विल्सन होता. विल्सन त्या मुलांनी दिलेले सगळे त्रास सहन करत होता. त्याच्या डोळ्यातून अश्रूधारा बाहेर येत होत्या. तो खाली जमिनीवर बसून रडत होता पण त्याला कोणीही मदत करत नव्हते. हे दृश्य लहान सुझीने लांबूनच पाहिले आणि ती पटकन विल्सनच्या जवळ आली. सुझी कराटे क्लास मध्ये जात होती. त्यामुळे ती न घाबरता विल्सन आणि त्या वाईट मुलांसमोर उभी राहिली. तिने त्या वाईट मुलांना शिस्तीत विल्सनला त्रास न देता तेथून जाण्यास सांगितले. पण त्या वाईट मुलांना वाटले की एक मुलगी काय करेल. ते तिलाही हसू लागले. तेव्हा सुझीने त्या वाईट मुलांना चांगलाच चोप दिला. तिने दिलेल्या माराने घाबरून ती वाईट मुले तेथून पळून गेली. सुझीने विल्सनला वाचवले आणि सुझी विल्सन जवळ जाऊन बोलणार इतक्यात तिचे आई वडील तेथे आले. ती विल्सनशी न बोलताच त्याला लांबून bye करून निघून गेली.

सुझीला हा प्रसंग आठवला आणि ती पटकन त्याला बोलू लागली.

"हो आठवले मला म्हणजे आपण लहानपणापासूनचे मित्र आहोत बरोबर ना? आणि सर ज्या वेळी तुमचे शिक्षण पूर्ण झाले तेव्हा मी अमेरिकेत शिक्षण करत होते त्यामुळे तुम्हाला इस्राईल मध्ये मी सापडले नसेल. "

विल्सन-"हो कदाचित तसेच असेल म्हणून तुला शोधूनही मला तू भेटली नाही आणि त्यानंतर मी सुद्धा माझ्या संशोधनात व्यस्थ झालो आणि त्यानंतर तुझी माहिती काढणे मला जमलेच नाही पण आता मला तू भेटली आहेस ना मग तू मला यापुढे सर वैगेरे न बोलता फक्त विल्सन म्हण. "

विल्सनच्या बोलण्यावर सुझीही हसली आणि तीही विल्सनला बोलली.

"ठीक आहे विल्सन पण तुही मला मिस सुझी न बोलता फक्त सुझी म्हण आणि आता मी तुझी मैत्रीण बर का? "

असे बोलून सुझी निघतच होती इतक्यात पुन्हा विल्सनने तिला थांबवले आणि बोलू लागला.

"सुझी मला एक विचारायचे आहे विचारू का? "

सुझी-"हो विचार ना? "

विल्सन-"तुला माहित असेलच की मी पत्रकारपरिषदेत म्हंटले आहे की मी 10 दिवसात जगात सर्वत्र पसरलेल्या महामारीवर तोड म्हणजेच antidote बनवणार आहे तर या दहा दिवसात तू देखील माझ्या सोबत राहशील का म्हणजे तुला जमणार असेल तर, चालेल का? खरं तर मला तुझ्या सोबत वेळ घालवायचा आहे शिवाय तुझी आवडनिवड तुझ्या सवयी सगळे जाणून घायचे आहे. "

विल्सनच्या या बोलण्यावर सुझीही खूप खुश झाली. जणू या संधीची ती वाटच बघत होती. विल्सनच्या या प्रश्नावर सुझीने त्याला होकार दिला आणि ती 10 दिवस त्याच्या सोबत राहण्यासाठी तयार झाली. सुझी एकदम खुश होऊन तेथून निघून गेली. तिच्या संरक्षणासाठी विल्सनने तिच्या सोबत त्याच्या एका माणसाला पाठवले. सुझीला खुश पाहून विल्सनही खुप खुश होता. त्याच्या आयुष्यात कोणीच मित्र किंवा नातेवाईक नव्हते. पण आता त्याला सुझीच्या रूपाने एक चांगली मैत्रीण मिळाली होती. त्यामुळे त्याचा आनंद गगनात मावत नव्हता.

जवळ जवळ दहा दिवस सुझी आणि विल्सन एकत्र काम करत होते. विल्सन त्या महामारीवर antidote बनवत होता आणि सुझी त्याच्या सोबत राहून त्याच्या जीवनावर डॉक्यूमेण्टरी बनवत होती. दोघेही खुप खुश होते.

विल्सनने 10 दिवसात antidote बनवले आणि त्याने बनवलेल्या antidote चा महामारीवर ग्रासलेल्या एका पीडित व्यक्तीवर उपायही करून बघितला आणि त्याने बनवलेल्या antidote मुळे तो मनुष्य ठीकही झाला. जो मनुष्य ठीक झाला होता त्यावर इस्राईलच्या त्याच 200 वैज्ञानिकांनी तपासणीही केली पण त्यांना बऱ्या झालेल्या त्या मनुष्याच्या शरीरात असलेले antidote विल्सनने कसे बनवले हे कळलेच नाही. खरं तर त्यांचा उद्देश असा होता की विल्सनने 10 दिवसात ते antidote बनवले की तसेच antidote बनवून पुन्हा विल्सनला जेल मध्ये पाठवायचे. आणि त्याने बनवलेल्या antidote ला स्वतःचे नाव देऊन जगभरात प्रसिद्ध व्हायचे. आता त्यांचा नाईलाज होत होता. त्यांना विल्सनने ते antidote कसे बनवले हेच कळत नव्हते. त्यामुळे अखेर त्यांनी विल्सन पुढे आपले हात टेकले. विल्सनच्या बनवलेल्या antidote चे सगळ्यांनी भरभरून कौतुक केले. शेवटी नाईलाजाने इस्राईलची जनता, सरकार आणि 63 देशांच्या दबावामुळे विल्सनला पुढील आयुष्य भरासाठी मुक्त केले. आता तो स्वच्छंदपणे इतर कोणत्याही देशात जाऊ शकत होता पण त्याआधी विल्सनला या महामारीवर खुप सारे antidote बनवायचे होते. हे काम तो स्वतः करणार होता. तो कोणाचीही मदत घेणार नव्हता. तशी परवानगीही इस्राईलच्या सरकारने त्याला दिली होती.

विल्सन आपल्या लॅब मध्ये antidote बनवत होता. अहोरात्र मेहनत करून त्याने 100 antidote बनवले होते. सुझीही त्याच्या मदतीला होतीच. विल्सन antidote बनवत होता इतक्यात त्याच्या लॅबच्या खाली सगळीकडे जवानांच्या एका special फोर्सने ताबा घेतला. विल्सनलाही तशी चाहूल लागलीच होती त्याने वरूनच खिडकीवरून पाहिले आणि त्याने आपल्यावरील आलेले संकट ओळखले आणि लगेच काही antidote शिवाय antidote चा फॉर्मुला लिहलेली डायरी आणि इतर आवश्यक सामान घेतले आणि सुझीला बरोबर यायला सांगून तो त्याच्या लॅबमधून निघत होता.

इतक्यात सुझीने आपल्या पाया जवळ लपवून ठेवलेली बंदूक काढली आणि मागून त्याच्यावर ती बंदूक रोखली. विल्सनला तर काहीच कळले नाही. त्याने मागे वळून पाहिले तर सुझी त्याच्यासमोर बंदूक ताणून उभी होती. विल्सनने तिच्याकडे पाहिले तर आज त्याला सुझी वेगळीच भासत होती. तिच्या डोळ्यात एक वेगळीच आग होती जणू ती आज विल्सनला त्याच्या पापांची शिक्षा देण्यासाठी तेथे उपस्थित होती. तिच्याकडे पाहून विल्सन तिला बोलू लागला.

"सुझी हे काय करतेस तू? "

सुझीला विल्सनने विचारलेल्या या प्रश्नावर सुझीने तशीच त्याच्यावर बंदूक ताणत उत्तर दिले.

"मी सुझी नाही माझे खरं नाव आहे इमा आणि मी एक CIA (Central Intelligence Agency) (*जसे भारतात raw agents आहेत तसेच अमेरिकेत Central Intelligence Agency चे agents आहेत*) ची agent आहे. "

सुझीचे हे बोलणे ऐकून विल्सन चांगलाच शॉक झाला पण थोडया वेळाने स्वतःला सावरत चेहऱ्यावर हसू आणत त्याने मोठया हुशारीने सुझीकडून लक्ष हटवले आणि तिच्या मागे लक्ष टाकत तो बोलू लागला.

"थँक गॉड सर तुम्ही आलात नाहीतर... "

विल्सनने असे बोलल्यावर सुझीनेही गाफिल राहत मागे कोण येत आहे हे पाहिले. इतक्या वेळात विल्सनने सुझीकडून ती बंदूक हिसकावून घेतली. खरं तर मागे कोणीच नव्हते हा फक्त विल्सनने सुझीचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा केलेला डाव होता. सुझीला हे कळायला थोडा वेळ लागला. त्यामुळे विल्सनचे काम झाले. विल्सन त्याच बंदुकीच्या जोरावर सुझीला बंदी बनवून तिला तेथून घेऊन जात होता. सुझीही त्याच्याकडे तिचीच बंदूक असल्यामुळे त्याला प्रतिकार करूच शकत नव्हती. विल्सन मोठया हुशारीने आणि बुद्धीने आपल्या लॅब

मध्ये असलेल्या गुप्त जागेतून सुझीचे फोन, घड्याळ वैगेरे तेथेच लॅब मध्ये टाकून तिला घेऊन निघून गेला.

विल्सन आणि सुझी निघून गेल्यावर जवानांची special force विल्सनच्या लॅब मध्ये घुसली. त्यांनी सगळीकडे शोधले पण त्यांना कुठेच विल्सन दिसला नाही. ते सगळे तेथून निघणार होतेच त्याआधीच एक मोठा स्फोट झाला आणि थोडयाच वेळात विल्सनची लॅब संपूर्ण आगीने होरपळून त्याची राख रांगोळी झाली शिवाय विल्सनला पकडायला आलेली माणसेही त्या आगीत होरपळून मरण पावली.

दुसरीकडे विल्सन सुझीला जिचे खरे नाव इमा होते तिला घेऊन शहरापासून दूर अश्या एका जुन्या फॅक्टरी मध्ये आला होता. ती फॅक्टरीही विल्सनची पहिली लॅब होती जेथे त्याने खुप सारे संशोधन केले होते. विल्सनची ही लॅब शहरापासून थोडे दूर असल्याने त्याला कोणी शोधणे शक्यच नव्हते शिवाय त्या लॅबची त्यानेच सिस्टिमद्वारे केलेली security अशी होती की त्या लॅबच्या आत प्रवेश करणे कोणालाही जमणार नव्हते.

विल्सनने सुझीला एका खुर्चीवर बांधून ठेवले होते आणि तिच्यासमोर तो बसला होता. सुझी त्याच्याकडे रागाने बघत होती तेव्हा हसतच विल्सन तिला बोलला.

"हरामखोर, तू डॉक्यूमेण्टरी वैगेरेचे खोटे बहाणे दिलेस. मी पण मूर्ख. मला सगळं खरंच वाटलं. मी तुझ्यावर डोळे झाकून विश्वास ठेवला आणि तिथेच मी चुकलो. पण मी तुझी थोडया फार प्रमाणात चोकशी केली होती. त्यात तू CIA ची agent आहेस याची माहिती मला मिळाली नाही. शिवाय त्या दिवशी मी तुझ्या सोबत माझ्या माणसाला पाठवले होते. त्यालाही तुझ्याबद्दल काहीच संशय आला नाही. ते कसे केलेस तू? "

सुझी-"जेव्हा तू मला इस्राईल मध्ये शोधण्याचा प्रयत्न करत होतास तेव्हा मी अमेरिकेत शिक्षण घेत होती आणि माझे शिक्षण झाल्यावर मी CIA मध्ये काम करू लागले पण मी CIA agent आहे ही माहिती गुप्त होती आणि तुला तर चांगलेच माहित असेल ना की सगळयाच

CIA agent ची माहिती गुप्तच असते. तसे इतर लोकांसाठी मी डॉक्यूमेण्टरी बनवणे हेच माझे काम. पण माझे खरे काम CIA agent चे आहे. आम्हाला तसे ट्रैनिंग दिले जाते त्याचमुळे मी तुझ्या माणसाला सहज चकवा देऊ शकले.

इस्त्राईल मधील Mossad (*जसे भारतात raw agents आहेत तसेच इस्त्राईल मध्ये Mossad चे agents आहेत*) टीमला आणि अमेरिकेची CIA टीमला 'ब्लॅकआऊट डे' चा गुन्हेगार तूच आहेस हे माहित होते. पण तसे काही त्यांच्याकडे पुरावे नव्हते. म्हणून त्यांनी अमेरिकेची एक special टीम बनवली. ज्याची इन्चार्ज मी होते आणि त्यात इस्त्राईल मधील Mossad टीमनेही मला वेळोवेळी मदत केली. आम्ही इतके दिवस तुझी माहिती काढत होतो पण आम्हाला त्यात काहीच भेटले नाही. त्यामुळेच तुला भेटूनच काही माहिती मिळते का हे बघणे हाच आमच्याकडे एकमेव मार्ग होता म्हणून सहा महिन्यापासून तुला डॉक्यूमेण्टरीचा बहाणा करून भेटण्यासाठी आमची धडपड चालू होती.

तुझी अपॉइंटमेंट मिळाल्यावर मी अमेरिकेतून इस्त्राईलमध्ये आली आणि तुला भेटून काही माहिती मिळते का हे पाहत होती पण जेव्हा तू मला तुझ्या भावाबद्दल सांगितलेस आणि जेव्हा मी समोर त्याला पाहिले तेव्हा मला वाटले की तू निर्दोष आहेस पण जेव्हा मी तुझ्याच घरात तुझ्या हाताला मलमपट्टी करण्यासाठी त्याचे सामान कपाटात शोधत होते तेव्हा मला तुझ्या कपाटात एक काळ्या रंगाचा ज्याला मागे हुडी सारखी टोपी असलेला कोट मिळाला ज्यावर लिहले होते 'Manmade Evil'. ज्याची pattern आमच्याकडे असलेल्या माहिती नुसार थोडी फार ब्लॅकआऊट डे चा गुन्हेगाराने घातलेल्या कपड्यासारखीच होती म्हणून माझा तुझ्यावरचा विश्वास पुन्हा अविश्वासामध्ये बदलला आणि मी तुझ्या सोबत राहून तुझ्याच विरोधात पुरावे शोधू लागली पण मला सांग तू तुझ्या भावाबद्दल जी काही खोटी कहाणी रचली ती मस्त होती पण तुला साथ देणारा तो माणूस कोण आहे हे मात्र आम्हाला शोधूनही सापडले नाही आणि तो कोण आहे हेच मला जाणून घायचे आहे."

एवढा वेळ शांत असलेल्या विल्सनने सुझीचे बोलणे ऐकून एक क्रूर हास्य चेहऱ्यावर आणले आणि बोलू लागला.

"तू बरोबर बोललीस मी तुला माझ्या भावाबद्दल सगळी खोटीच कहाणी सांगितली आणि ज्याला तू त्या दिवशी पाहिलेस, ज्याने तुला त्या दिवशी बंदुकीच्या गोळीने मारण्याचा प्रयत्न केला आणि ज्याचा वार मी स्वतःवर घेण्याचे नाटक केले तो कोणी माझा साथी किंवा मनुष्य नव्हता. तर मी Laser technique च्या मदतीने बनवलेले माझेच एक संशोधन होते. ज्याच्यात समोरच्या व्यक्तीला आपल्या पुढे मनुष्यच उभा आहे असे वाटते. पण तसे नसून ते माझे बनवलेले उपकरण होते. ज्यात प्रखर प्रकाशाचे किरण एकत्र करून मानवी छटा निर्माण केली जाते आणि त्याचद्वारे मी त्या उपकरणात एक 3D मानवी image आधीच तयार केली होती. यात मी काळे कपडे घालून, चेहऱ्यावर मास्क आणि हातात बंदूक असलेल्या मनुष्याचा image तयार केला. शिवाय त्या उपकरणात असलेल्या feature मुळेच त्या माणसाचे कपडे, त्यावर असलेले रंग व्यवस्थित दिसू शकत होते. शिवाय त्यात laser technique द्वारेच मानवी छटा असलेल्या त्या माणसाची हालचालही होऊ शकते. फक्त त्या मानवी छटेला स्पर्श केला तर तो मनुष्य नसून विज्ञानाच्या मदतीने केलेले उपकरण आहे हे कोणालाही कळू शकत होते.

मी ते उपकरण तेथे आधीच कोणालाही दिसणार नाही आणि भेटणारही नाही या रीतीने बसवले होते आणि त्याचा रिमोटही माझ्याकडे होता. आपण त्या जागेच्या जवळ आल्यावर मी रिमोटने ते उपकरण चालू केले शिवाय मी त्या उपकरणासोबतच त्याच laser technique ने बनवलेली एक बंदूक म्हणजेच बंदुकीची image तयार केली होती ज्याच्या प्रहाराने कोणाला काहीच होणार नाही पण मला तुझा पूर्ण विश्वास कमावयाचा होता म्हणूनच ती laser बंदुक जरी image असली तरी मी त्या उपकरणावर थोडे काम केले आणि त्या उपकरणात आधीच बंदुकीच्या गोळीचा आवाज रेकॉर्ड केला आणि जेव्हा त्या काळ्या कपडे घातलेल्या माणसाने म्हणजेच image ने आपल्या हातातील बंदूक तुझ्यावर ताणली तेव्हा ती बंदूक laser ने

बनवली असल्याने त्या बंदुकीतून खऱ्या बंदुकीसारख्या गोळ्या बाहेर पडल्या नाहीत. फक्त बंदुकीतून गोळ्या बाहेर पडल्याचा आवाज आला आणि त्या laser बंदुकीतून खऱ्या बंदुकीसारख्या गोळ्या शरीरात घुसणार नाहीच किंवा यामुळे कोणाला काहीच इजा होणार नाही. फक्त त्या बंदुकीतून गोळ्या बाहेर पडल्यात अशी image दिसू शकते हे मला माहित होते. पण तरी देखील मी तुला वाचवण्याचे नाटक केले.

बाकी पुढे कश्या पद्धतीने गाडीच्या समोर तो काळे कपडे घातलेला म्हणजेच मी laser technique ने बनवलेला मनुष्य म्हणजेच image आला, कसे त्याने तुझ्यावर वार केला म्हणजेच त्या बंदुकीच्या image सोबत फक्त आवाज आला आणि कसे मी तुला वाचवले हे तर तुला माहित आहेच शिवाय हे उपकरण केवळ रात्रीच्या प्रकाशात चांगल्या पद्धतीने काम करू शकत होते आणि म्हणून मी रात्रीच तुला घेऊन तेथे गेलो आणि तुला वाचवण्यासाठी झेप घेतल्यावर मी कोणालाही अगदी तुलाही समजणार नाही अश्या पद्धतीने तेवढ्याच हुशारीने उपकरणाचे रिमोट हातात घेऊन त्याचे बटण बंद केले आणि म्हणूनच ते उपकरण बंद होऊन laser technique ने बनवलेला तो मनुष्यही धावत गायब झाला आणि त्याचमुळे तो कोणाला सापडला नाही. "

सुझी-"बापरे एवढं सगळे तू केलेस? मला वाटले तो कोणीतरी मनुष्य असेल. ते तूच बनवलेले संशोधन होते. एवढं सगळे कशाला. माझ्या मुख्य प्रश्नाचे म्हणजेच ब्लॅकआऊट डे चा गुन्हेगार तूच आहेस ना हे नाही सांगितलेस. "

विल्सन-"मी laser technique चे उपकरण बनवले ते फक्त तुझा माझ्यावर विश्वास बसण्यासाठीच. तू जेव्हा मला जेल मध्ये भेटण्यासाठी अपॉइंटमेंट घेतली होतीस तेव्हाच मी तुझ्याबद्दल माहिती काढली आणि त्यात मी तुझा लहानपणीचा फोटो पाहिला तेव्हा मी तुला ओळखले आणि मला कळले की तू तीच मुलगी आहेस जिने मला लहानपणी मदत केली होती. माझ्याकडे माझे म्हणण्यासारखे असे कोणीच नव्हते आणि म्हणून मला तुला गमवायचे

नव्हते म्हणून मी तुझी जास्त चौकशी न करताच तुझ्यावर विश्वास ठेवला. तुझ्या मुख्य प्रश्नाचे उत्तर म्हणजेच ब्लॅकआऊट डे चा गुन्हेगार मीच आहे. मीच 'We scientist' च्या वैज्ञानिकांना त्यांच्याच लॅब मध्ये मारले. "

सुझी-"तू जरी माझा लहानपणीचा मित्र असलास तरी तुला काय वाटले की मी तुझ्यासारख्या गुन्हेगाराला साथ देईल? तसे मुळीच होणार नाही शिवाय मला माहितच होते की ब्लॅकआऊट डे चा गुन्हेगार तूच आहेस पण मला हे तुझ्या तोंडून ऐकायचे होते. विल्सन तुझ्याकडे असलेल्या 'God's gift' म्हणजे देवाचे वरदान असलेल्या बुद्धिमतेचा उपयोग तू चांगल्या गोष्टीसाठी करत आहेस असेच सगळ्यांना आणि मलाही वाटत होते पण तू तर 'Human alien' नाही तर देवाने दिलेल्या बुद्धिमतेचा दुरुपयोग करून झालेला राक्षस आहेस. तुझे 'we scientist' शी काय एवढे वाकडे होते की तू त्यांना मारलेस? "

सुझीच्या या बोलण्यावर विल्सन चांगलाच चिडला. तो सुझी जवळ गेला आणि तिला कानाखाली मारली. सुझी विल्सनने तिला मारले तरीही न डगमगता त्याच्या उत्तराची वाट पाहत होती. विल्सन रागानेच तिला बोलू लागला.

"मी देवाने दिलेल्या बुद्धिमतेचा दुरुपयोग करून झालेला राक्षस नाही तर मी आहे 'Manmade Evil'. तुला असे वाटतेय की मला मिळालेली ही बुद्धिमत्ता मला देवाने दिली आहे तर तसे मुळीच नाही कारण माझ्याकडे असलेली ही बुद्धिमत्ता manmade म्हणजेच लोकांनीच निर्माण केली आहे. "

सुझी-"काय? तू खोटे बोलत आहेस. बुद्धिमत्ता लोक कसे बनवू शकतात? "

विल्सन-"तुला माझे बोलणे खोटेच वाटणार पण तेच सत्य आहे. मला सांग की we scientist मध्ये किती वैज्ञानिक काम करत होते? "

सुझी-"We scientist मध्ये 24 वैज्ञानिक होते पण याचा आणि तुझ्या बुद्धिमतेचा काय संबंध. "

विल्सन-"संबंध आहे कारण we scientist मध्ये 24 नाही तर 25 वैज्ञानिक होते. हे 25 वैज्ञानिक जगातील सर्वात हुशार आणि प्रथम क्रमांकाचे वैज्ञानिक होते. अमेरिकेलाही या वैज्ञानिकांवर खुप गर्व होता पण अमेरिकेला किंवा इतर कोणत्याच देशाला हे माहित नाही की हे 25 वैज्ञानिक कोणत्याही पातळीवर उतरून नवीन नवीन संशोधन करत. "

सुझी-"पण रेकॉर्ड नुसार तर we scientist मध्ये 24 वैज्ञानिक होते. तू काय बोलतोय ते मला कळत नाही? "

सुझीच्या या प्रश्नावर विल्सन रागानेच तिला बोलला.

"तसे ही माहिती कोणालाच नाही आहे आणि तुला सांगणे गरजेचे नाहीच आहे पण काय करणार तू माझी बालपणीची मैत्रीण आहेस ना म्हणून तुला तुझ्या मित्राची बुद्धिमत्ता किती आहे आणि त्यामागील रहस्य हे कळलेच पाहिजे म्हणून सांगतो. "

असे बोलून विल्सन सुझीला सविस्तर माहिती देऊ लागला.

29 वर्षाअगोदर.............

ठिकाण-अमेरिका

'We scientist' चे 25 वैज्ञानिक असेच एक नवीन संशोधन करत होते. ब्लड कॅम्प च्या दव्यारे हे जगासमोर समाजसेवेचे नाटक करत पण त्यांचा खरा हेतू होता की ब्लड कॅम्प मध्ये आलेल्या प्रत्येक माणसाच्या रक्ताचे sample गोळा करणे. या वैज्ञानिकांना असा मनुष्य बनवायचा होता जो एखादया मानवी यंत्र म्हणजेच रॉबोट पेक्षाही हुशार असेल. हे वैज्ञानिक ब्लड कॅम्प मधील पाच जणांचा एक गट करून त्यांच्या रक्ताचे sample एकत्र करून त्यावर वेगवेगळे प्रयोग करायचे आणि त्यातून त्यांनी एक नवीन लस शोधली ज्याचा प्रयोग जनावरावर करण्याआधी त्यांनी मानवावरच करायचे ठरवले आणि त्यांचा मानववतेला काळिमा फासणारा हा निर्णय गुप्त होता. अमेरिकेलाही याची काहीच कल्पना नव्हती. लसीकरण म्हणजे शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी दिलेले औषध पण याच लसीमध्ये त्यांनी अश्या घटकांचे मिश्रण केले होते ज्याने लसीकरण दिलेल्या मानवाची बुद्धिमत्ता इतरांपेक्षा 10 पटीने वाढेल पण याचे side effect काय असतील याची त्यांनी पर्वा केली नाही.

या वैज्ञानिकांनी स्वतः बनवलेल्या औषधाचा प्रयोग गरीब गर्भवती मातांवर केला. नऊ महिने त्यांना हे नवीन संशोधन केलेले लसीकरण बाळांसाठी उपयुक्त आहे असे सांगून त्यांना देण्यात आले. त्यांनी जवळ जवळ चार वेळा हा प्रयत्न चार गरीब गर्भवती मातांवर केला ज्यांच्या मागे कोणी नातेवाईक वैगेरे नाही पण या लसीकरणाचा प्रभाव किंवा side effect इतके होते की त्यांनी चारही वेळा केलेले प्रयत्न फोल ठरले आणि त्यांच्याच मुळे त्या चार गर्भवती मातांना आपली मुले गमवावी लागली. त्या चारही माता अगदी गरीब असल्याने किंवा त्यांच्या मागे कोणीही नसल्याने त्यांना याच वैज्ञानिकांनी काही पैसे देऊन शांत केले.

शेवटी त्यांनी अखेरचा पाचवा प्रयत्न विल्सनच्या आईवर करण्याचे ठरवले आणि त्यांनी तसे केलेही. त्यामुळे नऊ महिन्यांनी विल्सनच्या आईने विल्सनला जन्म दिला पण लसीकरणाच्या side effect मुळे विल्सन ऐवजी ती मरण पावली. विल्सन सुखरूप या जगात आला.

त्या 25 वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनाचे काहीही side effect विल्सनवर झाले नव्हते. तो खुपच सुदृढ होता. त्या 25 वैज्ञानिकांनी विल्सनला म्हणजेच एका लहान नुकत्याच जन्मलेल्या बाळाला जगासाठी मृत दाखवून आपल्या लॅब मध्ये नेले आणि त्याच्यावर वेगवेगळ्या पद्धतीने संशोधन चालूच ठेवले पण एका लहान मुलावर होणारा हा अन्याय त्याच 25 वैज्ञानिकांच्या टीममध्ये असलेल्या 'मॅडिसन' नावाच्या महिलेला पटला नाही आणि रुचलाही नाही. तसे तिला या बाकीच्या 24 वैज्ञानिकांचे असे वाईट किंवा illegal कृत्य आवडत नसे शिवाय तिने एक दोन वेळा त्यांच्या विरुद्ध जाण्यासाठी तयारीही केली. या वैज्ञानिकांचा मुख्य ऑलिव्हरने आणि त्याच्या इतर साथीदारांनी तिला आणि तिच्या कुटूंबाला मारण्याची भिती घातली. त्यामुळे ती काहीच करू शकत नव्हती.

पण आता एका लहान मुलावर चाललेले संशोधन आणि त्याचे हाल बघून मॅडिसनने एका रात्री मोठया जिद्दीने लहान विल्सनला तेथून पळवले आणि एका अनाथश्रमात नेवून ठेवले. दुसऱ्या दिवशी जेव्हा बाकीच्या 24 वैज्ञानिकांना हे कळले तेव्हा त्यांना हे कळायला उशीर लागलाच नाही की या सगळ्या मागे मॅडिसनच असणार पण जेव्हा ते मॅडिसनकडे गेले तेव्हा तिचा आधीच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. त्यानंतर त्या 24 वैज्ञानिकांनी मॅडिसनच्या कुटुंबालाही मारून टाकले आणि आपल्या सगळ्या research मधून आणि मॅडिसनने केलेल्या research मधूनही तिचे नाव काढून टाकले त्यामुळे रेकॉर्ड नुसार सगळ्यांना 'we scientist' ही 24 वैज्ञानिकांची टीम आहे एवढंच माहित आहे.

त्या 24 वैज्ञानिकांनी त्या लहान बाळाला म्हणजेच विल्सनला शोधण्याचा प्रयत्न केला पण त्यांना विल्सन कुठेच मिळाला नाही कारण विल्सनला मॅडिसनने ज्या अनाथआश्रमात ठेवले होते ते अमेरिकेचे अनाथआश्रम बंद होऊन इस्त्राईल मध्ये shift झाले होते. त्या 24 वैज्ञानिकांनी बनवलेल्या लसीकरणामुळे म्हणजेच त्यांच्या संशोधनामुळेच इतर मुलांपेक्षा 10 पटीने जास्त बुद्धिमत्ता ही विल्सन मध्ये आली.

हळू हळू विल्सनही मोठा होत गेला आणि त्याची बुद्धिमत्ताही वाढू लागली. त्याच्या बुद्धिमतेचे खास वैशिष्ट म्हणजे त्याच्या जन्मल्यापासूनच्या सगळ्या आठवणी एखाद्या कॉम्पुटर सारख्या त्याच्या डोक्यात फिट होत्या आणि लहानपणी इतर मुलांना आपण काय काय केले हे देखील आठवत नसले तरीही विल्सनला मात्र स्वतःच्या जीवनातील वयाच्या सगळ्या टप्प्यावरच्या आठवणी बरोबर लक्षात होत्या. म्हणून त्याला आपल्या आईचा मृत्यू कसा झाला शिवाय ते 24 वैज्ञानिक कोण होते हे देखील लक्षात होते. त्यामुळे त्याने इस्त्राईल मध्ये आपले शिक्षण घेतले आणि तो scientist झाला. त्याने वैज्ञानिकांची ताकद आपल्या डोळ्यांनीच पाहिली होती. त्याने आपल्या शरीराची चाचणी कित्येक डॉक्टरांकडे केली होती. त्यात त्याला काहीच सापडले नव्हते. त्या वैज्ञानिकांनी त्याच्यावर लसीकरण करून जे काही संशोधन केले होते त्याचा लवलेशही त्याच्या शरीरात कुठेही नव्हता. म्हणून विल्सनला हे कळले होते की वैज्ञानिक कोणतीही गोष्ट सहज करू शकतात.

आपले शिक्षण झाल्यावर अमेरिकेत राहूनच वयाच्या 15 व्या वर्षीच विल्सनने त्या 24 वैज्ञानिकांना मारण्याचा प्लॅन केला. त्याने बराच वेळ 24 वैज्ञानिकांच्या लॅबची संपूर्ण माहिती काढली आणि त्यानंतर व्यवस्थित तयारी करून त्यांच्या लॅबचे software crack करून आजूबाजूला असलेले कॅमेराही hack केले. lights च्या main switch मध्ये गडबड करून काळे कपडे घालून आणि अंधारात योग्य पद्धतीने दिसू शकेल असा त्यानेच तयार केलेला चष्मा घालून त्यांच्या लॅब मध्ये घुसला. तसे त्याने लॅब मधले software crack केले असले

तरीही त्याला आत जाण्यापासून अडवण्यासाठी security ची माणसे होतीच आणि त्यांच्या पासून वाचण्यासाठी त्याने 'Laughing gas' प्रमाणे 'Statue gas' तयार केली. ज्यामुळे माणसांना बोलता तर येऊ शकत होते पण हालचाली अचानक थांबतात. शिवाय शरीर कमकुवत होऊन त्यांचे हातपाय थंड पडून जागीच खिळून राहतात. याच रसायनाच्या मदतीने विल्सनच्या दुपट्ट, टिपट्ट ताकदीचे असलेल्या त्या security च्या माणसांना प्रतिकार करता आला नाही. विल्सनने आपल्याकडे असलेल्या धारदार सुऱ्याने वहशी जनावरासारखे सहजतेने त्यांना मारले.

याच गॅसच्या मदतीने इतर वैज्ञानिकांची देखील हालचालही थांबली ज्यामुळे त्यांची फक्त आर्त किंकाळी बाहेर आली त्यांना प्रतिकार करता आलाच नाही. विल्सनने सहजतेने त्या 23 वैज्ञानिकांना आणि त्यांच्या मुख्याला म्हणजेच ऑलिव्हरलाही आपल्या त्याच सुऱ्याने वहशी जनावरासारखे मारले. विल्सनने आपल्या चेहऱ्यावर विशिष्ट प्रकारचे त्यानेच बनवलेले मास्क घातले होते. त्याने बनवलेल्या gas म्हणजेच रसायनामुळे त्याला काहीही त्रास झालाच नाही. त्याने हातात जाड काळ्या रंगाचे gloves घातले होते. त्याचे fingerprints कोणालाही सापडले नाही. त्याने पायात घातलेले बूटही त्याच्या पायापेक्षा दोन, तीन इंच मोठे होते. त्याच्या बुटावरूनही त्याचा शोध कोणालाही घेता आला नाही.

तो बंदुक वापरून सगळ्यांना सहजतेने मारू शकला असता. पण मेलेल्या माणसांच्या शरीरात असलेल्या बंदुकीच्या गोळीने अमेरिकेच्या सरकारला विल्सनपर्यंत पोहचता आले असते आणि म्हणून विल्सनने त्याने तयार केलेल्या रसायनाचा आणि धारदार सुऱ्याचा उपयोग करून 24 वैज्ञानिकांना मारले. विल्सनने आपल्या बुद्धिमतेचा उपयोग करून एकही पुरावा मागे ठेवला नव्हता त्याचमुळे त्याला पकडणे शक्यच नव्हते.

विल्सनला आपल्या बुद्धीच्या जोरावर प्रसिद्धी आणि बक्कळ पैसा मिळवायचा होता पण जर त्याची बुद्धिमत्ता आणि त्याचे गूढ सगळ्या जगासमोर आले असते तर त्या 24

वैज्ञानिकांनी विल्सन हा त्यांनीच बनवलेला आविष्कार आहे हे जगासमोर मांडले असते आणि विल्सन प्रसिद्धी आणि पैसा दोन्ही पासून हुकला असता म्हणून विल्सनने एवढे मोठे पाऊल उचलून त्या वैज्ञानिकांना मारले. एवढेच नाही तर त्याने त्याच्या past म्हणजेच भूतकाळातील आपला कोट सोडून बाकी सगळ्या गोष्टी व्यवस्थित नष्ट केल्या जेणेकरून कोणी कितीही प्रयत्न केला तरीही कोणालाही त्याच्याबद्दल कधीच कोणती माहिती मिळणार नाही.

वर्तमानकाळ.....

ठिकाण-इस्राईल (Israel)

सुझीने विल्सनचे हे बोलणे ऐकले आणि तिला चांगलाच धक्का बसला कारण विल्सनच्या बुद्धीला तीच नाही तर जगातील सर्व जण 'God's gift' समजत होते पण त्याची बुद्धी ही तर manmade होती जी त्याच 25 वैज्ञानिकांनी ज्यांना सगळे चांगले वैज्ञानिक समजत होते त्यांचेच संशोधन निघाले. तिला आता ब्लॅकआऊट डे चा गुन्हेगार आणि गुन्हेगाराचे गुन्हेगारामागचे कारण समजले होते. ती तशीच शांतपणे विल्सनकडे बघत होती. विल्सन सगळे सांगून थोडा वेळ थांबला आणि बोलू लागला.

विल्सन-"मी वैज्ञानिक झालो आणि मी माझे पहिले संशोधन घेऊन इस्राईल मधल्या वैज्ञानिकांना दाखवले पण माझे वय लहान असल्याने त्यांनी माझ्या संशोधनाची सर्वासमोर फजिती केली पण माझ्या बुद्धिमतेला दाद दिली ती इतर 63 देशाने. तसे इस्राईल हे अमेरिकेनंतर विज्ञान क्षेत्रात प्रगती करत असलेला दुसऱ्या क्रमांकाचा देश होता आणि तेच या 63 देशांना बघवत नव्हते म्हणून या इतर 63 देशांनीच माझ्यासोबत मिळून गुप्त करार केला. तू वर्ल्ड वॉर, bio वॉर तर ऐकले असशीलच पण मी तयार केले Cold वॉर. "

सुझी-"गुप्त करार कोणता शिवाय Cold वॉर हे काय आहे? "

विल्सन-"Cold वॉर म्हणजेच शत्रूसमोर तलवार चालवायची पण अश्या शांत आणि संथ पद्धतीने ज्याची त्याला काहीच माहिती नसेल आणि एकाच घावात त्याचे साम्राज्य नष्ट होईल तरीही समोरचा शत्रू तलवार चालवणाऱ्यालाच आपला देव मानेल आणि त्यासाठीच आम्ही केलेल्या या गुप्त करारात इस्राईलचे नामोनिशाण मिटवण्याचे आम्ही ठरवले. "

सुझी-"म्हणजे काय करायचे नेमके मला कळले नाही. "

सुझीच्या या प्रश्नावर स्वतःची स्तुती आपल्या तोंडून सुझीला सांगण्यासाठी रागावलेला विल्सन क्षणार्धात खुपच खुश आणि आतुर झाला आणि सुझीला बोलू लागला.

विल्सन-"सुझी मला सांग इस्राईल मध्ये सर्वत्र पसरलेली महामारी नेसर्गिक आहे ना त्याचे मूळ कारण काय तुला माहित आहे का? "

विल्सनचे cold war चे रहस्य काय आहे आणि विल्सनचे उत्तर काय आहे हे सुझी कान टवकारून ऐकत होती म्हणून ती त्याला बोलली.

सुझी-"अर्थात इस्राईल मध्ये सर्वत्र पसरलेली महामारी नैसर्गिक आहे त्याचे कारण अद्यापही कोणाला शोधता आले नाही सगळे लोक असच म्हणत आहेत की बहुतेक देवानेच त्यांना त्यांच्या वाईट कृत्यासाठी हा शाप दिला आहे. "

विल्सन-"देव, किती मूर्ख आहेत ते लोक त्यांना इतकेही नाही माहित की ही महामारी देवाने नाही तर देवाने बनवलेल्या पण माणसाने तयार केलेल्या राक्षसाने म्हणजेच Manmade evil ने तयार केली आहे. "

सुझी-"म्हणजे तुला असं म्हणायचेय की ही महामारी नेसर्गिक नसून तू तयार केली आहेस. "

विल्सन-"हो अगदी बरोबर. ही महामारी मी तयार केली आहे. त्या 63 देशांबरोबर मिळून मी जो करार केला त्यातच मी इस्राईलला हळू हळू पण कोणाला कळणारही नाही अश्या पद्धतीने संपवण्याचा आराखडा केला. माझे पहिले संशोधन इस्राईलच्याच वैज्ञानिकांनी नाकारल्यावर मी इस्राईलच्याच भोळ्या भाबड्या जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी माझे अनेक संशोधन त्यांच्या भल्यासाठी वापरले त्यामुळे सगळे मला दुसरा देव समजू लागले.

काही वर्षांनी मी सगळ्या मोबाईल कंपनीला एक उपकरण बनवून दिले ज्याला मी नाव दिले होते 'GTN म्हणजेच Good Tool For Network' ते उपकरण मोबाईल टॉवरला लावले

की signal strength वाढते असे मी त्यांना सांगितले होते पण त्या उपकरणाचे खरे नाव होते 'GTN म्हणजेच 'Dangerous Tool For Normal People' कारण त्या उपकरणाने मोबाईलची signal strength तर वाढायची पण त्याहूनही अधिक धक्कादायक ज्याचा कोणी विचारही केला नसेल असे रहस्य त्यामागे होते. त्या उपकरणामुळे मोबाईल टॉवर मधून येणाऱ्या rediation मधून घातक प्रकारचे छोटे स्फटिक बाहेर पडत जे हवेत सहज विरून जात पण त्या स्फटिकांमुळेच मानवी जीवाला धोका आहे हे मी त्यांना सांगितले नाही.

हे स्फटिक मानवी शरीरात पूर्णपणे राहण्यासाठी किंवा या स्फटिकांनी मानवी शरीराचा ताबा घेण्यासाठी जवळ जवळ 10 वर्ष जाणे गरजेचे होते. म्हणून मी गुन्हेगारांना ठेवण्याच्या नावाखाली असे जेल आधीच बनवले होते ज्यात बाहेरच्या दूषित हवेचा एकही कण आत येऊ शकणार नाही आणि माझी बुद्धिमत्ता ही कोणालाही घातक ठरू शकते असा बहाणा करून 63 देशांना इस्राईलवर दबाव टाकण्यासाठी सांगून मला 10 वर्ष त्याच जेल मध्ये कैद करायला लावले. खर सांगायचे तर त्यांनी मला कैद केले नाही तर मी स्वतःचे केलेले संशोधन किती सफल झाले हे मीच बनवलेल्या माझ्या घरात राहून बघत होतो आणि 10 वर्षांनी माझ्या संशोधनाला यश आले, ज्याचा मी विचार केला होता तेच झाले मी तयार केलेल्या उपकरणामुळेच आज इस्राईलच्या बहुतांशी लोकांना मीच तयार केलेल्या महामारीने ग्रासले आहे ज्याचा शेवट फक्त मृत्यूनेच होणार आहे शिवाय आता थोडयाच दिवसात इस्राईलचे नामोनिशाण मिटणार आहे आणि आता मी बनवलेले antidote इस्राईलच्या सरकारला देऊन मी दुसऱ्या देशात जाणार आहे आणि मला कोणीही अडवू शकत नाही कारण तशी इस्राईलच्या सरकारनेच मला परवानगी दिली आहे आणि इस्राईलमधील जनताही माझ्या सोबत आहे.

कळलं का सुझी मी किती महान आहे ते. मी केवळ माझ्या एकाच डावाने तू म्हंटल्याप्रमाणे मानवी राक्षस असूनही सर्वासाठी दुसरा देव बनलो. "

विल्सन एवढे बोलून आपल्या कामाचे कौतुक सुझीला सांगून निर्दयीपणे हास्य करत होता मात्र विल्सनच्या या बोलण्यावर सुझी चांगलीच चक्रावली होती कारण ज्या महामारीला सगळे नैसर्गिक समजत होते त्याला बनवणारा हा विल्सनच होता. जसजसे विल्सनचे एक एक गुपित बाहेर येत होते तसतसा तिला धक्काच बसत होता. सुझीने जेवढा विचार केला होता त्याहून अधिक भयानक विल्सनचा चेहरा तिला दिसत होता. पण तरीही स्वतःला अजून खंबीर करत आणि उरलेल्या प्रश्नांची उत्तरे माहिती करून घेण्यासाठी ती त्याला बोलू लागली.

"मला सांग पण एवढे 10 वर्ष तू जेल मध्ये राहण्यापेक्षा दुसऱ्या देशात जाऊ शकत होतास मग तू तसे का नाही केलेस आणि इस्राईल मधल्या महामारीवर तूच antidote बनवले आहेस आणि तुझ्या बनवलेल्या antidote मुळे तो मनुष्यही ठीक झालाच आहे आणि तुझ्याच antidote चा वापर करून इतर नागरिकही ठीक होतीलच मग इस्राईलचे नामोनिशाण मिटणार हे तू कसे बोलू शकतोस. "

सुझीच्या प्रश्नावर विल्सन आपले क्रूर हास्य करतच तिच्याकडे बघून तिला बोलू लागला.

"मी इतर 63 देशांसोबत मिळून जो करार केला होता त्यात एक अट होती की मी कसलेही आणि काहीही संशोधन करू शकतो पण हे सगळे मी इस्राईल मध्येच राहून केले पाहिजे. जो पर्यंत हे संशोधन यशस्वी होत नाही तो पर्यंत इस्राईल सोडून मला कुठेही जाता येणार नाही आणि त्याचमुळे मी 10 वर्ष इतर देशात न जाता इस्राईल मध्येच राहिलो शिवाय मी बनवलेल्या antidote मुळे महामारीतून बरा झालेला मनुष्य फक्त एक ते दोन वर्षच जगू शकतो त्यानंतर त्याचा मृत्यू निश्चित आहेच शिवाय त्या बऱ्या झालेल्या माणसावर कोणीही कितीही तपासणी केली तरी मी antidote कसा बनवला आहे किंवा माझी पद्धत काय आहे हे कोणालाच कळणार नाही आणि त्याचमुळे 200 वैज्ञानिकांनी तपासणी केल्यावरही त्यांना काहीच सापडले नाही. या महामारीचा योग्य उपाय म्हणजेच antidote बनवण्याचा फॉर्मुला ज्याने मनुष्य व्यवस्थित बरा होईल तो मी माझ्या या डायरीत लिहला आहे पण अर्थात मी तुला

किंवा तुझ्या टीमला तो देणार नाहीच आहे आणि कोणी कितीही प्रयत्न केला तरी त्यांना माझे हे ठिकाण मिळणार नाही आणि तुलाही इथून सोडायला कोणी येणार नाही. "

विल्सनच्या या बोलण्यावर सुझी आश्चर्यचकित झालीच होती कारण एक साधारण मनुष्य ज्याच्याकडे फक्त बुद्धिमत्ता आहे त्याने काहीही अलौकिक शक्ती वैगरे न वापरता फक्त विज्ञानाचा वापर करून एखाद्या राक्षसाहून अधिक किळसवाणा खेळ रचला ज्यात सामान्य मनुष्याला बळी पडावे लागले.

सुझीला विल्सनचा प्रचंड राग येतच होता तरीही एवढा गंभीर प्रसंग असताना ती जोरजोरात हसू लागली. तिला असे हसताना पाहून विल्सनच्याही चेहऱ्यावरचे हसू गायब झाले. थोडया वेळाने सुझी 'पाच' 'चार' 'तीन' असे अंक बोलू लागली. विल्सनला तर ती काय करते आहे हे कळलेच नाही. सुझी पुन्हा 'दोन' आणि 'एक' एवढे बोलली. तिने 'एक' बोलल्यावर विल्सनने ज्या फॅक्टरी मध्ये सुझीला ठेवले होते त्या संपूर्ण परिसराचा commandos नी ताबा घेतला होता. बंदुकीच्या गोळ्यांचा आवाज फॅक्टरीत सर्वत्र पसरत होता. विल्सनने लगेच आपल्या CCTV camera द्वारे बाहेर काय चालेले आहे हे बघितले तर तेथे खुप सारे commandos फॅक्टरीचा ताबा घेऊन उभे होते. ते पाहून या commandos ला मी आणि सुझी कुठे आहे हे कसे कळले याचे त्याला आश्चर्य वाटत होतेच पण तरीही आश्चर्यापेक्षा त्यांच्यावर खुप रागही येत होता. त्याची ती द्विधा मनस्थिती ओळखुन सुझीच त्याला बोलली.

"तू फार मोठा आणि हुशार वैज्ञानिक आहेस आणि म्हणूनच तू मला माझे घड्याळ, मोबाईल वैगरे सगळे आपण जेथून आलो त्या लॅब मध्येच ठेवायला सांगितलेस कारण तुला माहित होतेच की त्यात transmitter असणार आणि मोठया हुशारीने आपण तेथून निघून गेल्यावर त्या लॅब मध्ये आधीच सेफ्टीसाठी बसवलेल्या बॉम्बने तुझ्याकडे असलेल्या रिमोट द्वारे स्फोट घडवलास कारण तुला माहित होते की असे कधी ना कधी तरी घडणार होतेच म्हणून तू तुझ्याच लॅब मध्ये बॉम्ब फिट केले होतेस जे योग्य वेळी वापरता येईल.

तसे तू एक बरोबर ओळखलेस कारण माझ्या घड्याळात एक transmitter होतेच पण माझ्या शरीरात मी हातात ऑपेरेशन करून फिट बसवलेले transmitter तू नाही ओळखू शकलास. त्याच transmitter मुळे तुझे सगळे बोलणे माझी संपूर्ण टीम ऐकत आहे आणि तू मला कुठे ठेवले आहेस हेही transmitter द्वारे track करून त्यांनी शोधून काढले. आता त्याच transmitter मध्ये save झालेल्या तुझ्याच रेकॉर्डिंगचा वापर करून तुला जन्मठेपेची शिक्षा मिळणार आहेच पण अर्थात जर आता या commandos च्या हातून तू वाचलास तरच. तसेही तुला मिळालेल्या या बुद्धीचा तू चांगला वापर केला असतास तर ही वेळ आलीच नसती. Manmade evil म्हणजेच मानवाने बनवलेला मानवी राक्षस बरोबर ना, मी मानते की तुला बनवणारे राक्षस होते पण तू तुझ्या बुद्धीचा चांगला उपयोग करून एक चांगला मनुष्य बनूच शकला असतास मग तसे तू का केले नाहीस? "

सुझीने असे बोलल्यावर आणि आपण पूर्णपणे अडकलोय या विचाराने विल्सन मनातून थोडा घाबरला तर होताच पण तरीही त्याला स्वतः केलेल्या संशोधनावर जास्तच विश्वास होता म्हणून तो तिला बोलू लागला.

"मला मिळालेल्या बुद्धीचा चांगला वापर करून झाले काय तर इतर वैज्ञानिकांकडून फजितीच पण त्याचाच वाईट वापर करून आता माझ्याकडे प्रसिद्धी आणि बक्कळ पैसा आहे एवढंच नाही तर ज्या वैज्ञानिकांकडून माझी फजिती झाली तेच वैज्ञानिक माझ्या बुद्धीसमोर झुकले आहेत आणि आता मी थोडयाच वेळात हा देश सोडून खुप दूरवर निघून जाईल. राहिला प्रश्न तुझ्या commandos चा तर त्यांनी आधी मला पकडायला हवे ना मी बनवलेली ही लॅब म्हणजेच एक चक्रव्यूह आहे ज्यात आत येणे कोणालाही शक्य नाही. तुझे commandos आत येऊच शकणार नाहीत तर मला पकडणार कसे? "

विल्सनच्या या अपेक्षित उत्तरावर सुझी त्याला बोलू लागली.

सुझी-"मला माहित होतेच तू हा प्रश्न करणार, तू बनवलेले जेल जेव्हा मी पाहिले ना तेव्हाच मला तुझी बुद्धिमत्ता कळली आणि म्हणूनच मी त्या commandos ला अश्या सूचना दिल्या आहेत की जास्तीत जास्त 15 मिनिटे वाट पहा आणि जर आम्ही दोघे जेथे असू तेथून बाहेर नाही आलो तर तुम्ही ती जागा उध्वस्त करा किंवा त्याचा नायनाट करा कारण तुझ्यासारख्या Manmade evil ला संपवणे गरजेचे आहे. आता केवळ सात मिनिटेच बाकी आहेत. बघ विचार कर, तू जर सगळे गुन्हे कबूल करून सगळ्यांची माफी मागितलीस तर तुझी शिक्षा कमी होईल नाहीतर तुझा मृत्यू येथेच होईल. "

सुझीच्या बोलण्याने विल्सन घाबरला तर होताच पण तरी देखील चेहऱ्यावर भीती न दाखवता तो तिला रागानेच बोलू लागला.

विल्सन-"मी आणि गुन्हे कबूल करू असं काहीच होणार नाही आणि तुम्ही साधारण माणसे मिळून मला मारणार नाहीच कारण मी तयार केलेल्या महामारीचे योग्य antidote बनवण्याचा फॉर्मुला माझ्या डायरीत आहे आणि त्याची तुम्हाला गरज आहेच शिवाय माझ्या सोबत तुझाही मृत्यू होईल ना आणि मला माहित आहे तू सगळे खोटे बोलतेस. "

सुझी-"विल्सन हेच सत्य आहे आणि जेव्हा मी देशासाठी काम करण्याचे ठरवले ना तेव्हाच त्या देशाला वाचवण्यासाठी केव्हाही मरणाला आलिंगण देण्यासाठी मी तयार आहे. मग मी मेले तरी चालेल पण तुझ्यासारख्या मानवाने बनवलेल्या या मानवी राक्षसाला सोडणार नाही आणि राहिला प्रश्न योग्य antidote चा तर मी 10 दिवस तुझ्या सोबत होते ना तेव्हाच जसे जमेल तसे तू बनवलेले antidote आणि तुझ्या सगळ्या डायरीचे फोटो काढून मी ते इतर वैज्ञानिकांना पाठवले आहेत त्यातच योग्य antidote बनवण्याचा फॉर्म्युला होता आणि त्यांनी त्यांच्याच मदतीने योग्य antidote बनवलेही आहेत आणि ही माहिती गुप्त असल्याने कोणत्याही देशाला त्याची खबर नव्हती आणि म्हणूनच तुझ्या सोबत असलेल्या इतर 63 देशांनाही नव्हती म्हणून ते देखील तुला याबाबत काहीच सांगू शकले नाहीत एवढेच नाही तर

तुझ्या मृत्यू नंतर त्या 63 देशांनाचेही सगळे हक्क रद्द करण्यात येतील आणि इस्त्राईल मधील सगळे नागरिक पुन्हा सुखी, आनंदी आणि सुदृढ होतील आणि तुला जे सगळे लोक दुसरा देव मानत होते त्यांनाही कळेल की तू देव नसून Manmade evil म्हणजेच मानवाने बनवलेला मानवी राक्षस आहेस. "

सुझीचे बोलणे ऐकून विल्सन सुझीवर चांगलाच रागावला होता पण तो आता काहीच करू शकत नव्हता. सुझी पुन्हा आपल्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू आणत 'पाच' 'चार' असे अंक बोलू लागली आणि विल्सनने रागानेच आपली सगळी शक्ती एकवटून तिला चांगलीच थोबाडीत मारली. विल्सनने मारल्याने सुझीच्या तोंडातून रक्त येऊ लागले पण तरीही तिच्या चेहऱ्यावर हसू होते. तिने खुर्चीला बांधलेले आपले हात विल्सनशी बोलता बोलता सोडले होते. ती चेहऱ्यावर हसू आणतच खुर्चीवरून उठली आणि पुन्हा 'तीन' 'दोन' 'एक' असे म्हंटले. विल्सनचे हृदयही घाबरून तिच्या अंकासोबत जोरात धडधडू लागले. सुझीने 'एक' असा अखेरचा अंक म्हंटल्यावर त्या संपूर्ण फॅक्टरीत एक मोठा स्फोट झाला.

एका आठवड्यानंतर................

ठिकाण-अमेरिका

अमेरिकेच्या एका टीव्ही विकण्याच्या दुकानात भल्या मोठया टीव्हीवर news चॅनेल लावले होते आणि दुकानाच्या बाहेरून पारदर्शक काचेतून एक मुलगी व्हीलचेअर वर बसून त्या टीव्ही मधली बातमी आपले डोळे मोठे करून बघत होती. त्या news मध्ये इस्राईल या शहराची news दाखवत होते. त्यात विल्सन ज्याला लोक दुसरा देव मानत होते त्याचे खरं रूप जगापुढे दाखवले जात होते शिवाय तोच 'ब्लॅकआऊट डे' चा गुन्हेगार आहे हेही सिद्ध झाले होते आणि विल्सननेच त्याच्या डायरीत लिहलेल्या योग्य antidote च्या फॉर्मुल्याचा वापर करून इतर वैज्ञानिकांनी बनवलेल्या योग्य antidote मुळे इस्राईल मधील महामारीचे शिकार झालेले लोक बरे होत होते शिवाय तिकडच्या मोबाईल कंपन्यानी विल्सनने बनवलेले 'GTN' चे उपकरण आता प्रत्येक towers मधून काढले होते आणि त्याची योग्य ती विल्हेवाट लावली होती आणि विल्सनला साथ देणाऱ्या 63 देशाविरुद्ध इस्राईलच्या सरकारनेच गुन्हा दाखल केला होता आणि इतर देशांच्या संमतीने त्यांचे सर्व हक्क, अधिकार रद्द करण्यात आले होते. इस्राईल मधील जनजीवन सुखी झाले होते शिवाय विल्सन सारखा परत कोणी राक्षस विज्ञानाच्या मदतीने निर्माण होऊ नये याची पूर्ण दक्षता घेतली जात होती पण विल्सनचे कृत्य समोर आणणाऱ्या व्यक्तीचे रहस्य हे गूढ होते कारण त्या व्यक्तीची कोणतीही माहिती ही news channel ला दिली गेली नव्हती. एवढी news बघितल्यावर त्या दुकानाच्या मालकाने channel बदलले.

ही सर्व news मध्ये दाखवली जात असलेली बातमी ऐकून ती मुलगी खुश झाली होती. जी मुलगी ही बातमी टीव्ही वर डोळे विस्फारून पाहत होती ती दुसरी तिसरी कोणी नसून

सुझी म्हणजेच CIA agent इमा होती. फॅक्टरी मध्ये झालेल्या स्फोटात विल्सन तर मारला गेला पण सुझी मात्र देवाच्या कृपेने जिवंत राहिली होती. जवळ जवळ एक आठवडा ती हॉस्पिटल मध्ये होती आणि एका आठवड्यानंतर बरे झाल्यावर तिला आज हॉस्पिटल मधून डिस्चार्ज मिळाला होता. स्फोटात तिच्या दोन्ही पायांवर बराच मार लागला होता त्यामुळे तिचे शरीर बरे झाले असले तरी पाय अजूनही बरे झाले नव्हते म्हणूनच ती व्हीलचेअरचा वापर करत होती. तिच्या सोबत असलेल्या साथीदारासोबत ती इस्पितळामधून बाहेर पडली. तिचा साथीदार गाडी आणण्यासाठी तिला इस्पितळाच्या बाहेर ठेवून गेला होता. सुझी तशीच इस्पितळाच्या बाहेर व्हीलचेअरवर बसली होती की तिने जवळच एका टीव्हीच्या दुकानात चाललेली ही news पाहिली आणि ती तशीच बाहेर व्हीलचेअरवर बसून news पाहू लागली. ती news पाहून तेथून निघतच होती इतक्यात तिचा तो साथीदार तिच्या जवळ आला आणि तिला काय पाहत होती हे विचारू लागला. त्या साथीदाराच्या बोलण्याने भानावर येत तीही त्याला news पाहत होती असे बोलून तेथून निघू लागली. सुझी कसली news पाहत होती याची उत्सुकता असलेल्या त्या साथीदाराने पुन्हा तिला 'कोणती news पाहत होतीस म्हणजे news ची headline काय होती' असा प्रश्न केला तेव्हा सुझी पुढे जाता जाता थांबली आणि त्याच्याकडे मागे वळून हसून त्याला त्याला बोलू लागली 'Manmade evil died'.

# सारांश

मित्रहो, तुम्हाला हा प्रश्न पडला असेलच ना की काल्पनिक कथेत सारांशाची काय गरज शिवाय काल्पनिक कथेत सारांश असतोच कुठे पण या कथेत मात्र सारांश आहे.

विज्ञान हे एक असे तंत्रज्ञान आहे ज्यावर मनुष्यच नाही तर संपूर्ण देश अवलंबून असतो शिवाय विज्ञान इतके प्रगल्भ आहे की ज्याचा अभ्यास करून नवीन नवीन तंत्रज्ञानाने देशाचा विकासही घडवता येतो आणि सदैव घडत आहे पण याचा दुरुपयोग करून असेच काही Manmade evil तयार न व्हावे अशी देखील माझी इच्छा आहे. मी ही कथा लिहण्यामागचा उद्देश सगळीकडे विज्ञानाचा दुरुपयोगच होत आहे असा मुळीच नाही पण सगळ्यांना हे समजणे गरजेचे आहे की विज्ञान हे असे साधन आहे ज्याचा उपयोग करून मनुष्याने मनुष्याच्या साथीने देशाचा विकास घडवायचा आहे याउलट मनुष्याचा घात करून देशाचा विकास करण्याची मुळीच गरज नाही. Manmade evil म्हणजे माणसाने बनवलेला मानवी राक्षस पण असे माणसाने तयार केलेले मानवी राक्षस विज्ञानच नाही तर प्रत्येक क्षेत्रात तयार होण्याची भिती आहेच त्यामुळे त्यांचा नायनाट करणे सध्या हीच काळाची गरज आहे

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात खूप सारे संकटे येतात आणि त्या संकटाला त्याला सामोरे जावेच लागते पण ही संकटे पार करताना कोलमडून जाऊन चुकीच्या वाटेवर पाऊल टाकण्यापेक्षा भयभीत न होता योग्य दिशेने पाऊल टाकून त्याचा सामना करणे म्हणजेच जीवन आहे. या कथेतही विल्सनच्या आयुष्यात बरीच संकटे आली. त्याला मिळालेली बुद्धिमत्ता ही 'We scientist' च्या 25 वैज्ञानिकांनी त्याला दिलेला शापच होता पण याच बुद्धिमतेच्या बळावर विल्सन जगात नवीन क्रांती आणि विकास आणू शकत होता पण तरीही त्याने तसे न करता याच बुद्धिमतेचा एखाद्या तलवारीप्रमाणे वापर करून इतरांचा घात केला. We scientist' च्या 25 वैज्ञानिकांनी जरी मानवी राक्षसाला म्हणजेच विल्सनच्या बुद्धिमतेला

बनवायचे काम केले असले तरीही चांगल्या आणि वाईट या दोन दिशांमधून योग्य दिशा निवडणे हे त्याच्याच हाती होते त्यामुळे सामान्य मनुष्यापासून मानवी राक्षस होण्याला तो स्वतः जबाबदार होता. जर कदाचित विल्सनने आपल्या बुद्धीचा उपयोग चांगल्या कामासाठी केला असता तर जे जे लोक त्याला दुसरा देव मानत होते त्यांचे म्हणणे खरे झाले असते इतकेच नाही तर त्याच्या बालमैत्रिणीने म्हणजेच सुझीनेही त्याची अखेर पर्यंत साथ दिली असती.

थोडक्यात सांगायचे झाले तर प्रचंड बुद्धिमत्ता असणे चांगलेच पण त्याचा गैरवापर करणे हे एक चूकच आहे कारण नेहमीच शक्तीपेक्षा युक्तिच श्रेष्ठ असते आणि अशी युक्ती फक्त बुद्धिमतेद्वारेच येऊ शकते त्याचमुळे आपल्या शक्तीबरोबरच युक्तीचाही योग्य तो उपयोग आपण केलाच पाहिजे शिवाय सध्याच्या या युगात अलौकिक शक्ती असलेले राक्षस नाही आहेत त्यामुळेच त्यांना मारण्याची गरजही नाही आहे तर या युगात सर्वात मोठे राक्षस आहेत माणसातील राग, क्रोध, इर्ष्या, लोभ, पैसा इत्यादी या सर्व गोष्टी आणि जर आपण माणसातील याच गोष्टी नष्ट केल्या तरी देखील माणसातील राक्षसाचा वध करता येईल आणि जर प्रत्येकाने आपल्यातील याच गोष्टीचा नायनाट केला तरच Manmade Evil म्हणजेच मानवाने बनवलेला मानवी राक्षस पुन्हा तयार होणार नाहीच.

पुन्हा एकदा सर्वांचे मनापासून आभार. पुढील कथा घेऊन भेटूच तोपर्यंत Keep reading.


समाप्त

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो वाचनाने माणूस शहाणं होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. प्रत्यक्ष अनुभवासारखा शिक्षक नाहीच. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे. एक एक पुस्तक म्हणजे व्हिटामिनची एक एक गोळी असते असं समजा. शहाणं करून सोडणारं व्हिटामिन. आणि जसे इतरांचे अनुभव तुम्हाला शहाणं करतात तसे तुमचे अनुभव इतरांना सांगून त्यांना शहाणं करायचं काम तुम्ही करू शकता. तुम्ही तुमचे अनुभव लिहून ई साहित्यकडे पाठवा. बाकी सर्व आम्ही बघू.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं…

…आणि स्वतःही लिहायला हवं.